# महाराष्ट्र विधानसभा

## दुसरे अधिवेशन, २०२५

---

## तारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**मंगळवार, दिनांक १५ जुलै, २०२५ / आषाढ २४, १९४७ ( शके )**

| | | |
|---|---|---|
| **(१)** | **मुख्यमंत्री** | **यांचे प्रभारी विभाग** |
| **(२)** | **पर्यावरण व वातावरणीय बदल, पशुसंवर्धन मंत्री** | |
| **(३)** | **इतर मागास बहुजन कल्याण, दुग्धविकास, अपारंपारिक ऊर्जा, दिव्यांग कल्याण मंत्री** | |
| **(४)** | **पर्यटन, खनिकर्म, माजी सैनिक कल्याण मंत्री** | |
| **(५)** | **माहिती तंत्रज्ञान, सांस्कृतिक कार्य मंत्री** | |
| **(६)** | **परिवहन मंत्री** | |

---

**प्रश्नांची एकूण संख्या - ५५**

---

### राज्यातील हजारो ठेवीदारांची मैत्रेय ग्रुपच्या कंपन्यांनी केलेली फसवणूक

**(१) * १३१९७ श्री.अमोल खताळ (संगमनेर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील हजारो ठेवीदारांची सुमारे २५०० कोटी रुपयांची फसवणूक करणाऱ्या मैत्रेय प्लॉट्स अँड स्ट्रक्चर्स प्रा.लि. आणि मैत्रेय सुपरस्ट्रक्चर्स प्रा.लि. या कंपन्यांविरोधात माहे मे, २०२५ मध्ये स्थानिक पोलिसांकडे तक्रारी दाखल करण्यात आल्या आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने संबंधितांविरुद्ध कारवाई करण्यासह अशा फसवणूकीच्या घटनांना आळा घालण्याबाबत तसेच गुंतवणूकदारांचे रक्कम परत मिळवून देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) मैत्रेय प्लॉट्स अँड स्ट्रक्चर्स प्रा.लि. आणि मैत्रेय सुपरस्ट्रक्चर्स प्रा.लि. या कंपन्यांविरोधात माहे मे, २०२५ मध्ये स्थानिक पोलिसांकडे तक्रारी दाखल नाहीत. परंतु, सन २०१६ ते २०१८ दरम्यान एमपीआयडी कायद्यांतर्गत मैत्रेय ग्रुप ऑफ कंपनीज विरोधात महाराष्ट्रामध्ये ३१ गुन्हे दाखल आहेत.

(२) सदर गुन्हयांपैकी २८ गुन्ह्यांमध्ये मा.न्यायालयात दोषारोपपत्र दाखल केले आहे. १ गुन्हा ‘क’ वर्ग करण्यात आला असून २ गुन्हे तपासाधिन आहेत.

(३) मैत्रेय ग्रुप ऑफ कंपनीज मधील ३० दाखल गुन्हयात एकुण ५६ आरोपी आहेत. त्यापैकी १६ आरोपींना अटक करण्यात आली असून ३६ पाहिजे आरोपी आहेत. ०४ आरोपी हे अटकपूर्व जामीनावर असून ०१ आरोपी मयत आहे. महाराष्ट्र ठेवीदारांच्या (वित्तीय संस्थांमधील) हितसंबंधाचे संरक्षण अधिनियम १९९९ (एमपीआयडी) कायद्यातील तरतुदीनुसार मालमत्ता जप्त करण्याबाबत एकूण ०७ अधिसूचना राजपत्रात प्रसिध्द करण्यात आलेल्या असून ४०९ मालमत्ता अधिसूचित करण्यात आलेल्या आहेत. जप्त केलेल्या मालमत्तेवर नियंत्रण ठेवण्याकरीता उप जिल्हाधिकारी तथा सक्षम प्राधिकारी (एमपीआयडी), मुंबई शहर यांची सक्षम प्राधिकारी म्हणून नेमणूक करण्यात आली आहे. सदर गुन्हयातील जप्त मालमत्तेचे मूल्यांकन व लिलाव करण्यासाठी क्विकर रिॲलिटी प्रायव्हेट लिमिटेड या कंपनीची नियुक्ती केली आहे. संबंधित प्रकरणात सक्षम प्राधिकारी यांचे वतीने मा. न्यायालयात अर्ज व शपथपत्र दाखल करण्यात आलेले असून मालमत्ता विक्रीची परवानगी मागितलेली आहे. त्यानुसार मा.न्यायालयाने दि.०५.०८.२०२४ व दि.०६.०१.२०२५ रोजी ३६० मालमत्ता निरपेक्ष करून विक्री करण्याची परवानगी देण्यात आलेली आहे. सध्या मालमत्तेच्या लिलावाची कार्यवाही करण्यात येत आहे. सदर मालमत्ता विक्रीतुन जमा होणाऱ्या रकमांतून गुंतवणूकदारांना वाटप करण्याचे प्रस्तावित आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**वाटेगाव (ता.वाळवा, जि.सांगली) येथील प्रेरणा विद्यालय या मतिमंद मुलांच्या निवासी शाळेस शासकीय अनुदान न मिळाल्याबाबत**

**(२) * ९७९० श्री.सत्यजित देशमुख (शिराळा) :** सन्माननीय **दिव्यांग कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कासेगांव (ता.वाळवा, जि.सांगली) येथील दानिश सामाजिक व शैक्षणिक चारिटेबल ट्रस्ट, या संस्थेमार्फत सन २००८ पासून वाटेगाव येथे "प्रेरणा विद्यालय मतिमंद मुलांची निवासी शाळा" सुरु असून सदर शाळेमध्ये शिक्षक व कर्मचारी अत्यंत अल्प मानधनावर कार्यरत असल्याने त्यांना अनेक अडचणींचा सामना करावा लागत असल्याचे माहे, २०२५ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शासन परिपत्रकानुसार १५ वर्षे पूर्ण झालेल्या शाळांना अनुदान देण्याची तरतूद असतानाही उक्त शाळेकडून शासकीय अनुदान मिळण्याबाबत शासनाकडे वारंवार प्रस्ताव सादर करण्यात येवूनही कोणतेही शासकीय अनुदान मिळालेले नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त शाळेस शासकीय अनुदान त्वरीत मिळण्याबाबत दानिश सामाजिक व शैक्षणिक चॅरिटेबल ट्रस्ट, कासेगांव (ता.वाळवा, जि.सांगली) या संस्थेमार्फत स्थानिक लोकप्रतिनिधींना लेखी निवेदन दिलेले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन उक्त मतिमंद मुलांच्या निवासी शाळेकरीता त्वरीत अनुदान देण्याकरीता कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अतुल सावे :** (१) हे खरे नाही.

सदर उपक्रमास आयुक्त, दिव्यांग कल्याण, पुणे यांनी नोंदणी प्रमाणपत्र क्र.ए-२९९, दि.०३ जून, २००९ अन्वये २५ निवासी विद्यार्थी संख्येवर कायमस्वरुपी विनाअनुदान तत्वावर मान्यता प्रदान केली आहे. सदर नोंदणीप्रमाणपत्राचे नुतनीकरण दि.३१ मार्च, २०२८ पर्यंत वैध असून संस्थेने शासन निर्णय दि.१८ ऑगस्ट, २००४ च्या आकृतीबंधानुसार शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची मानधन तत्वावर नियुक्ती केली आहे.

(२) होय, हे खरे आहे.

अनुदान धोरण शासन निर्णय दि.१६ जुलै, २०२४ मधील नियम २ (ii) नुसार उपक्रमास १५ वर्षे पुर्ण झाल्यानंतर त्याचा अनुदान निर्धारणासाठी विचार करता येईल, अशी तरतूद आहे. तथापि, सदर उपक्रम धोरणातील इतर तरतुदींच्या अनुषंगाने तपासणी केली असता, उपक्रम शासकीय अनुदानासाठी अपात्र असलेबाबतची शिफारस आयुक्तालय स्तरावरील छाननी समितीने दि.१८ फेब्रुवारी, २०२५ रोजीच्या पत्रान्वये शासनास केली आहे.

(३) होय, हे खरे आहे.

(४) शासन निर्णय दि.१६ जुलै, २०२४ मधील तरतुदींनुसार सदर उपक्रमाच्या अनुदान प्रस्तावाची छाननी केली असता, उपक्रम अनुदानास अपात्र असलेबाबत आयुक्त, दिव्यांग कल्याण, पुणे यांनी दि.१८ फेब्रुवारी, २०२५ रोजीच्या पत्रान्वये संबंधित संस्थेस अवगत केले आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**भामरागड (जि.गडचिरोली) येथील खंडी-नैनवाडी गावात वीज पुरवठा सुरु करण्याबाबत**

**(३) * १२६२१ श्री.राजु तोडसाम (अर्णी), श्री.संजय गायकवाड (बुलढाणा), श्री.मोहन मते (नागपूर दक्षिण) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भामरागड (जि.गडचिरोली) येथील खंडी-नैनवाडी गावात वीजेचे खांब उभारून तारांची जोडणी करणे तसेच वीज पुरवठा सुरु करण्यासाठी शुल्क भरले असतांनाही माडीया जमातीच्या लोकवस्तीत वीज पुरवठा सुरू करण्यात आला नसल्याचे दिनांक २८ एप्रिल, २०२५ रोजी निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, महावितरण प्रशासनाकडून खंडी-नैनवाडी गावात वीज जोडणीसाठी टाळाटाळ केली जात असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून खंडी-नैनवाडी गावात वीज पुरवठा सुरु करण्याबाबत कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) हे अंशत: खरे आहे.

भामरागड तालुक्यातील मौजा खंडी-नैनवाडी या गावाचे विद्युतीकरण करण्याकरीता जिल्हा वार्षिक सर्वसाधारण योजना २०२४-२५ प्रशासकीय मान्यता मिळून रु.५०.०० लक्ष निधी प्राप्त झाल्यानंतर मे.स्नेहल इलेक्ट्रिकल अन्ड सर्व्हिसेस या कंत्राटदारास दि.२४.०३.२०२५ रोजी कार्यादेश दिले होते. त्यानुसार सदर कंत्राटदाराने ४.०० कि.मी. उच्चदाब वाहिनी, १.५० कि.मी. लघुदाब वाहिनी व ६३ के.व्ही.ए. रोहीत्राचे काम पूर्ण केले. सदर विद्युत संचमांडणी भारीत करण्याकरीता विद्युत निरिक्षक, गडचिरोली यांचेकडून दि.२९.०४.२०२५ रोजी परवानगी प्राप्त झाल्यानंतर दि.३०.०४.२०२५ रोजी सदर गावाचा विद्युत पुरवठा सुरु करण्यात आला. आजपावेतो मौजा खंडी-नैनवाडी गावातील ८ कुटुंबांनी वीज पुरवठयाकरीता अर्ज सादर केलेला होता व त्या सर्व ८ कुटुंबांना घरगुती वीज पुरवठा करण्यात आला आहे. कोणताही वीज पुरवठा मागणी अर्ज प्रलंबित नाही.

(२) हे खरे नाही.

(३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

----------------

## रायगड व रत्नागिरी जिल्ह्यातील शहरी भागात बसविण्यात आलेल्या सी.सी.टी.व्ही. कॅमेऱ्यांची दुरुस्ती करण्याबाबत

**(४) * १४२५९ श्री.रविशेठ पाटील (पेण) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रायगड व रत्नागिरी जिल्ह्यातील शहरी भागात गुन्हेगारी, गैरप्रकार आणि अवैध पार्किंग यावर आळा घालण्यास मदत व्हावी याकरिता बसविण्यात आलेल्या सी.सी.टी.व्ही. कॅमेऱ्यांपैकी जवळपास ५०% कॅमेऱ्यांची वेळेत देखभाल व दुरुस्ती न झाल्याने सद्य:स्थितीत बंद पडले असल्याची बाब माहे जून, २०२५ मध्ये निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अनेक ठिकाणी बसविलेल्या सी.सी.टी.व्ही. कॅमेऱ्यात कैद होत असलेले फुटेज हे धूसर दिसणे, कैद करण्यात आलेल्या वेळेत तफावत असणे तसेच नियंत्रण करणारी यंत्रणा वेळोवेळी देखभाल-दुरुस्ती करत नसल्याच्या अनेक तक्रारी निदर्शनास आल्या आहेत, हे देखील खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी करुन रायगड व रत्नागिरी जिल्ह्यातील शहरी भागात सुरक्षिततेच्या दृष्टीने बसविण्यात आलेले परंतु बंद अवस्थेत असलेल्या सर्व सी.सी.टी.व्ही. कॅमेऱ्यांची दुरुस्ती करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) (अ) रायगड जिल्ह्यातील शहरी भागात नगरपालिका, पोलीस ठाणे, डीपीडीसी (जिल्हा नियोजन विकास निधी) रेन्युसेस इंडिया लि. कंपनी कडून सी.एस.आर. फंडातून, प्रतिष्ठीत नागरिक, स्थानिक कंपन्या व लोकसहभागातून वर्गणी जमा करुन असे एकूण ३०० सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्यात आलेले आहेत. त्यापैकी २२१ सीसीटीव्ही कॅमेरे चालू स्थितीत आहेत. त्याचा तपशील पुढीलप्रमाणे आहे :-

| जिल्ह्याचे नाव<br>शहराचे नाव | एकूण<br>सीसीटीव्ही | कार्यरत<br>सीसीटीव्ही | बंद<br>सीसीटीव्ही |
|---|---|---|---|
| **खोपाली जि.रायगड<br>(डीपीडीसी फंड)** | ११४ | ७० | ४४ |
| **रसायनी जि. रायगड<br>(सीएसआर फंड)** | ३८ | ३८ | ०० |
| **पेण जि. रायगड<br>(लोकसहभागातून निधी)** | ३२ | १८ | १४ |
| **अलिबाग जि. रायगड<br>(डीपीडीसी फंड)** | ११६ | ९५ | २१ |
| **एकूण :-** | **३००** | **२२१** | **७९** |

सदर सीसीटीव्ही कॅमेरे गृह विभागाकडून लावण्यात आले नाहीत, त्यांच्या दुरुस्ती व देखभाल यंत्रणा या वेगवेगळया आहेत. बंद सीसीटीव्ही कॅमेऱ्यांबाबत स्थानिक पोलीस यंत्रणेकडून पाठपुरावा करण्यात येत आहे.

(ब) रत्नागिरी येथील खालील सीसीटीव्ही पोलीस विभागामार्फत बसविण्यात आलेले आहेत :-

| | | | |
|---|---|---|---|
| **रत्नागिरी जि. रत्नागिरी<br>(डीपीडीसी फंड)** | ५७ | २० | ३७ |

(२) होय हे खरे आहे.

(३) (अ) रायगड जिल्ह्यातील शहरी भागात बसविलेल्या सीसीटीव्ही कॅमेऱ्यांची देखभाल व दुरुस्ती नगरपरिषदेने कंत्राटदार कंपन्यांना दिले असून दुरुस्ती करण्यासाठी पोलीस अधिक्षक, रायगड यांच्या कार्यालयाकडून वेळोवेळी कळविण्यात आले आहे.
(ब) रत्नागिरी जिल्ह्यातील शहर पोलीस ठाणे हद्दीतील देखभाल व दुरुस्ती करण्याची जबाबदारी असणाऱ्या कंपनीकडे पाठपुरावा पोलीस अधिक्षक रत्नागिरी यांच्या कार्यालयाकडून करण्यात येत आहे. सदर कंपनीचे प्रतिनिधी यांचेसोबत पोलीस अधिक्षक, रत्नागिरी यांनी बैठक घेऊन सदर कॅमेरे त्वरीत सुरु करण्याच्या सूचना दिलेल्या आहेत. तसेच सदर कंपनीस काम विलंब केल्याच्या कारणास्तव दंड आकारुन दंडाची रक्कम भरणा करण्याबाबत पत्रव्यवहार पोलीस अधिक्षक रत्नागिरी स्तरावरुन करण्यात आला आहे. तसेच सदर कंपनीस काळ्या यादीत समाविष्ट करण्याबाबत पत्र पोलीस अधिक्षक रत्नागिरी यांच्या कार्यालयाकडून पोलीस महासंचालक कार्यालयास पाठवण्यात आले आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## पनवेल (जि.रायगड) येथील सारा नर्सिंग कॉलेजमधील विद्यार्थ्याने गळफास घेऊन केलेली आत्महत्या

**(५) * १४२०० श्री.संतोष बांगर (कळमनुरी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पनवेल (जि.रायगड) येथील सारा नर्सिंग कॉलेजमधील एका विद्यार्थ्याला प्राचार्यांकडून अश्लील शब्दाचा वापर करत जीवे मारण्याची धमकी दिल्याने, त्यांच्या जाचाला कंटाळून सदर विद्यार्थ्याने दिनांक ३ जून, २०२५ रोजी महाविद्यालयाच्या वसतीगृहामध्ये गळफास घेऊन आत्महत्या केल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर प्रकरणी पनवेल तालुक्यातील पोलिस ठाण्यात गुन्हा नोंदविण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने संबंधितांविरुद्ध कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) व (२) हे खरे आहे.

सदर प्रकरणी पनवेल तालुका पोलीस ठाणे गु.र.क्र. १५४/२०२५, भारतीय न्याय संहिता-२०२३ कलम १०८, ३५२ सह अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती (अत्याचार प्रतिबंधक) अधिनियम-१९८९ चे कलम ३ (१) (आर) (एस), ३ (२) (५) अन्वये दि.१०.०६.२०२५ रोजी गुन्हा नोंद करण्यात आला आहे.
(३) सदर गुन्ह्यातील महिला आरोपीचा शोध घेण्यासाठी तपास पथके तयार करण्यात आलेली असून गुन्ह्याचा तपास सुरु आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील यशवंतराव चव्हाण मुक्त वसाहत योजनेमार्फत विमुक्त जाती व भटक्या जमाती प्रवर्गातील लाभार्थ्यांना घरकुलाचे लाभ देण्याबाबत

**(६) * ७१९३ श्री.संतोष दानवे (भोकरदन), श्री.नरेंद्र भोंडेकर (भंडारा), श्री.संदिप क्षीरसागर (बीड) :** सन्माननीय **इतर मागास बहुजन कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील विमुक्त जाती व भटक्या जमाती प्रवर्गातील लाभार्थ्यांना घरकुलाचे लाभ देण्याकरिता यशवंतराव चव्हाण मुक्त वसाहत योजना शासनामार्फत राबविण्यात येत असून सदर योजनेकरिता तीन कोटी रुपये प्राप्त झाले

असतांना अधिकाऱ्यांच्या निष्काळजीपणामुळे सदर निधी परत गेल्याचे माहे मे, २०२५ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर योजनेचा लाभ फक्त ग्रामीण भागातील लाभार्थ्यांना देण्यात येत असून शहरी भागात राहणाऱ्या विमुक्त जाती व भटक्या जमाती प्रवर्गातील लाभार्थ्यांना या योजनेच्या लाभापासून वंचित रहावे लागत असल्याने त्यांना देखील ही योजना लागू करण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर योजनेतंर्गत एका घरकुलास १ लाख २० हजार रूपये देण्यात येत असून बीड जिल्ह्यात दिनांक ३१ मार्च, २०२५ रोजी २७ हजार २८१ घरकुल मंजूर करण्यात आले असता पहिला हप्ता ३ हजार रुपये देण्यात आला असून त्यामध्ये बांधकाम करणे शक्य होत नसल्याने ते वाढवून देण्यात यावे अशी मागणी होत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन या योजनेची व्याप्ती शहरी भागापर्यंत वाढविण्याबाबत तसेच संबंधित अधिकाऱ्यांची चौकशी करुन सदर निधीचा वापर विहित वेळेत करण्यासाठी व बीड जिल्ह्यात लाभार्थ्यांच्या पहिल्या हप्त्यामध्ये वाढ करुन निधी वेळेवर देण्याकरिता कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अतुल सावे :** (१) हे अंशत: खरे आहे.

यशवंतराव चव्हाण मुक्त वसाहत योजनेंतर्गत शासन निर्णय दिनांक ३१.०३.२०२५ अन्वये सन २०२३-२४ आणि सन २०२४-२५ मध्ये कार्योत्तर मान्यता देण्यात आलेल्या घरकुलांसाठी एकूण रु.३५.०० कोटी इतका निधी विविध जिल्ह्यांतील सहाय्यक संचालक तथा आहरण व संवितरण अधिकारी यांना वितरीत करण्यात आला होता. तथापि, सहाय्यक संचालक इतर मागास बहुजन कल्याण, भंडारा, चंद्रपूर आणि सोलापूर यांनी तांत्रिक अडचणींमुळे एकूण रु.७,६०,५०,०००/- इतका निधी शासनखाती समर्पित केला आहे.

(२) हे खरे आहे.

(३) सदरहू योजनेंतर्गत सन २०२४-२५ करीता बीड जिल्ह्यातील २७,२८१ घरकुलांना कार्योत्तर मान्यता देण्यात आली असून त्यांकरीता रु.९.१४ कोटी इतका निधी वितरीत करण्यात आला आहे. उर्वरित निधी योजनेंतर्गत उपलब्ध आर्थिक तरतुदीनुसार देण्यात येणार आहे. सद्य:स्थितीत मंजुर लाभार्थ्यांची नोंदणी करण्याची प्रक्रिया संबंधित जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा यांच्याकडून सुरु आहे.

(४) सदरहू योजना शहरी भागात लागू करणे शक्य आहे किंवा कसे याबाबत तपासणी करुन अहवाल सादर करण्याबाबत संचालक, इतर मागास बहुजन कल्याण संचालनालय, पुणे यांना कळविण्यात आले आहे.

तसेच, योजनेंतर्गत सन २०२४-२५ मध्ये शासनखाती समर्पित करण्यात आलेल्या निधीच्या अनुषंगाने सहाय्यक संचालक, इतर मागास बहुजन कल्याण, भंडारा, चंद्रपूर आणि सोलापूर यांच्याकडून खुलासा मागविण्यात आला आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मालगाव (ता.मिरज, जि.सांगली) येथील पुलाजवळ गाईची अवैध वाहतूक करणाऱ्या पिकअप गाडीचा अपघात झाल्याबाबत

**(७) * ८२३९ श्री.निलेश राणे (कुडाळ) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मालगाव (ता.मिरज, जि.सांगली) येथील पुलाजवळ गाईची अवैध वाहतूक करणाऱ्या पिकअप गाडीचा अपघात झाल्याची घटना दिनांक २८ एप्रिल, २०२५ रोजी घडली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर अपघाताच तीन गाई जखमी व एका गाईचा मृत्यू झाल्याने मिरज ग्रामीण पोलिसांत गुन्हा दाखल करण्यात आला असून, उक्त ग्रामीण पोलीस ठाण्याच्या हद्दीत अवैध गाईची वाहतूक करणाऱ्या वाहनाचा सलग दुसरा अपघात घडला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने सखोल चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने दोषीविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय हे खरे आहे.
(२) हे अंशतः खरे आहे.
सदर वाहनातून वाहतुक होत असलेल्या ०४ गायी पैकी ०२ गायी जखमी होवुन नंतर मयत झाले आहेत.
(३) सदर प्रकरणी चालकाविरुध्द प्राण्याचा छळ प्रतिबंधक अधि. कलम ११ (१) (D) (E) (F) (H), प्राण्यांचे परिवहन नियम ५६, बीएनएस कलम २८१,१२५ (अ), १२५ (ब), ३२४ (४) मो. वा. का. कलम १८४,१४६/१९६, ३(१)/१८१ प्रमाणे गुन्हा दाखल केला आहे. आरोपीस दि.२८/०५/२०२५ रोजी बीएनएसएस ३५(३) प्रमाणे नोटीस देण्यात आली आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## धाराशिव नगरपालिकेअंतर्गत झालेल्या कोट्यवधी रुपयांच्या गैरव्यवहाराबाबत

**(८)** * **१३३६३ श्री.सुरेश धस (आष्टी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) धाराशिव नगरपालिकेअंतर्गत झालेल्या कोट्यवधी रुपयांच्या गैरव्यवहाराबाबत विशेष तपास पथकाची (SIT) स्थापना होऊनही अद्यापपर्यंत कोणत्याही प्रकारची चौकशी वा कारवाई केली नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, त्यामुळे सदर प्रकरणी SIT संदर्भात एक नोडल ऑफिसर यांची नेमणूक करण्याबाबत व विशेष लेखा परिक्षणाबाबतचे पत्र पोलीस अधिक्षक, धाराशिव तसेच जिल्हाधिकारी, धाराशिव यांना दिनांक ३ जून, २०२५ रोजी दिले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुषंगाने उक्त गैरव्यवहाराप्रकरणी चौकशी करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) हे अंशत: खरे आहे.

सदर गुन्हयाच्या तपासाकामी शासनाचे दि.०७.०६.२०२४ रोजीच्या पत्राच्या संदर्भान्वये पोलीस अधिक्षक, धाराशिव यांनी त्यांच्या दि. ०९.०९.२०२४ च्या आदेशान्वये विशेष तपास पथक SIT ची स्थापना केली आहे.

सदर एसआयटी विशेष तपास पथकाचे तपास प्रमुख अपर पोलीस अधिक्षक यांनी त्यांच्या दिनांक २५.१२.२०२४ व दिनांक २०.०६.२०२५ च्या पत्रान्वये सदरच्या गुन्ह्याच्या अनुषंगाने नगर परिषद, धाराशिव येथील विशेष लेखा परिक्षण होणे अत्यंत गरजेचे असल्याने सदरचा गुन्हा घडला त्या कालावधीतील विशेष लेखापरिक्षण करण्याकरिता मा. जिल्हाधिकारी धाराशिव यांना शिफारस करण्यात आली आहे.

त्यानुषंगाने मा. जिल्हाधिकारी, धाराशिव यांच्याकडुन दिनांक ३०.०६.२०२५ च्या पत्रान्वये मा.संचालक, स्थानिक निधी लेखापरिक्षा संचालनालय, महाराष्ट्र राज्य, कोकण भवन, मुंबई यांना सदर गुन्ह्यातील आर्थिक बाबींचा तपास करण्याकामी धाराशिव नगरपरिषद येथील आर्थिक विशेष लेखा परिक्षण होऊन मिळण्याबाबत विनंती करण्यात आली आहे.

मा.संचालक, स्थानिक निधी लेखापरिक्षा संचालनालय, महाराष्ट्र राज्य, कोकण भवन यांच्याकडुन नगरपरिषद, धाराशिव येथील विशेष लेखापरिक्षण केल्यानंतर व त्यासंबंधीचा विशेष लेखापरिक्षण अहवाल प्राप्त झाल्यानंतरच पुढील चौकशी करण्यात येणार आहे.

(२) होय, हे खरे आहे.

सदर एसआयटी विशेष तपास पथकाचे तपास प्रमुख अपर पोलीस अधिक्षक यांनी त्यांच्या दिनांक २५.१२.२०२४ व दिनांक २०.०६.२०२५ च्या पत्रान्वये सदरच्या गुन्ह्याच्या अनुषंगाने नगर परिषद, धाराशिव येथील विशेष परिक्षण होणे अत्यंत गरजेचे असल्याने सदरचा गुन्हा घडला त्या कालावधीतील विशेष लेखापरिक्षण करण्याकरिता मा. जिल्हाधिकारी धाराशिव यांना शिफारस करण्यात आली आहे.

(३) उपरोक्त प्रमाणे विशेष लेखापरिक्षण केल्यानंतर त्यानुषंगाने अहवाल प्राप्त झाल्यानंतर पुढील चौकशी करण्यात येणार आहे. तसेच सदर गुन्ह्यातील आरोपींना जामीन देते वेळी मा. उच्च न्यायालय खंडपीठ, औरंगाबाद यांनी प्रकरणामध्ये केवळ प्रशासनिक अनियमितता असलेबाबत निरीक्षण नोंदविले आहे.

तसेच आरोपींविरुध्द CRPC कलम १९७ अन्वये आरोपींवर अभियोग दाखल करण्यापुर्वी मंजुरी करिता सदर गुन्ह्यातील तपास अधिकारी, उपविभागीय पोलीस अधिकारी यांच्या दि.१२.०१.२०२५ च्या पत्रान्वये सक्षम प्राधिकारी, उपसचिव, नगर विकास विभाग, मंत्रालय यांना प्रस्ताव सादर करण्यात आला आहे.

(४) विलंब नाही.

-----------------

## भिवंडी (जि.ठाणे) येथे बेकायदेशीर सुरु असलेल्या हुक्का पार्लरबाबत

**(९) * ९८१७ श्री.रईस शेख (भिवंडी पूर्व), श्री.बापूसाहेब पठारे (वडगाव शेरी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भिवंडी (जि.ठाणे) येथे बेकायदेशीर सुरु असलेल्या हुक्का पार्लर विरोधात लोकप्रतिनिधींकडून माहिती दिली असतानाही पोलिसांकडून कोणतीही कार्यवाही करण्यात येत नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्यामुळे लोकप्रतिनिधींची नाहक बदनामी होत असून अशा संबंधित पोलीस कर्मचाऱ्यांविरुद्ध कारवाई करण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनीधीनी दिनांक ११ एप्रिल, २०२५ रोजी मा.मुख्यमंत्री महोदयाकडे पत्रव्यवहार केला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच पुणे शहरातील सर्वात मोठ्या हुक्का बारला संरक्षण देण्यासाठी पोलीस उपनिरीक्षकच दरमहा रुपये ३० हजार इतक्या रकमेचा हप्ता घेत असल्याचे निदर्शनास आल्याने त्यांना पोलीस आयुक्तांनी निलंबित केले असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने संबंधितांविरुद कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) नाही.

ठाणे शहर पोलीस आयुक्तालयांतर्गत भिवंडी शहर पोलीस ठाणे हद्दीत लपून-छपून हुक्का पुरविणाऱ्यांवर माहे जानेवारी ते जुन २०२५ या कालावधीत एकूण ४ गुन्हे दाखल असून, २० आरोपींना अटक करण्यात आली आहे. सदर गुन्ह्यांत रू.३०,२००/- इतका मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. त्यापैकी एका गुन्ह्यात दोषारोपपत्र दाखल करण्यात आले असून, ३ गुन्ह्यांचा तपास सुरू आहे.

पोलीस अधीक्षक, ठाणे ग्रामीण यांच्या अधिपत्याखालील भिवंडी तालुका पोलीस ठाणे हद्दीत लपून-छपून हुक्का पुरविणाऱ्यांवर माहे जानेवारी ते जुन, २०२५ या कालावधीत एकूण ८ गुन्हे दाखल असून, २४ आरोपींना अटक करण्यात आली आहे. सदर गुन्ह्यांत रू. ६३,७४०/- इतका मुद्देमाल जप्त करण्यात आला असून, सर्व आठही गुन्ह्यात दोषारोपपत्र दाखल करण्यात आले आहे.

(२) होय.

लोकप्रतिनिधींची बदनामी केल्याने संबंधित सहायक पोलीस निरीक्षकास पोलीस अधीक्षक, ठाणे ग्रामीण यांच्या दिनांक ०३.०७.२०२५ रोजीच्या आदेशान्वये "पुढील देय वार्षिक वेतनवाढ ०१ (एक) वर्षाकरिता पुढील वेतनवाढीवर परिणामकारक होणार नाही अशा प्रकारे स्थगित करणे" ही शिक्षा देण्यात आली आहे.

(३) व (४) होय.

काळेपडळ पोलीस ठाणे, पुणे शहर येथील पोलीस उपनिरीक्षकांनी बिबिसी रूफटॉप किचन ॲण्ड बार, मोहम्मदवाडी, पुणे यांचेकडून पैसे स्विकारून महाराष्ट्र नागरी सेवा (वर्तणूक) नियम, १९७९ मधील नियम ३ चे उल्लंघन केल्याने त्यांना दिनांक २२.०५.२०२५ रोजीपासून निलंबित करण्यात आले आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## बीड जिल्ह्यातील घोडका राजुरी-पिंपळगाव मोची दरम्यान एसटी बसचा अपघात होऊन तीन विद्यार्थ्यांचा झालेला मृत्यू

**(१०) * ११३८८ श्री.संदिप क्षीरसागर (बीड) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बीड जिल्ह्यातील एसटी महामंडळाच्या आगारात बीड ते परभणी मार्गावर जाणाऱ्या रा.प.बस क्र.एम.एच.२० एमएच १४७३ चा मोची पिंपळगाव फाट्याच्या पुढे घोडका राजुरीच्या नजिक दिनांक १९ जानेवारी, २०२५ रोजी अपघात झालेला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर अपघातात घोडका राजुरी येथील पोलीस भरतीची तयारी करत असलेले तीन युवक विद्यार्थी श्री.सुबोध बाबासाहेब मोरे, श्री.विराट बब्रुवान घोडके व श्री.ओम सुग्रीव घोडके यांचा बसच्या धडकेत जागीच मृत्यू होवून इतर दोन युवक विद्यार्थी जखमी झाले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर अपघातातील मृतांच्या कुटुंबातील एका सदस्यास विशेष बाब म्हणून महामंडळांतर्गत सेवेत सामावून घेण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी करुन मृत व जखमींच्या कुटुंबियांना आर्थिक मदत देणे तसेच मृतांच्या कुटुंबियातील सदस्यास सेवेत सामावून घेणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रताप सरनाईक :** (१) होय.

(२) सदर अपघातात ०३ व्यक्तींचा मृत्यु झाला आहे. मात्र अपघातात ०२ युवक विद्यार्थी जखमी झाल्याची नोंद रा.प. महामंडळाकडे नाही.

(३) होय.

(४) व (५) सदर अपघातातील ३ मयत मुलांच्या नातेवाईकांना प्रत्येकी रु.१०,०००/- प्रमाणे रु.३०,०००/- तात्कालीक मदत देण्यात आलेली आहे. तसेच पी फॉर्म देवून आवश्यक कागदपत्रांची माहिती सांगण्यात आली, रा. प. महामंडळाच्या नियमांनुसार नुकसान भरपाई रक्कम अदा करण्यासाठीची सदर आवश्यक कागदपत्रे मयतांच्या पालकांनी अद्यापपर्यंत सादर केलेले नाही.

सदर रा. प. बस अपघातात मयत झालेल्या व्यक्तींच्या नातेवाईकांना परिपत्रक दि.०७.१०.२०१६ अन्वये प्रचलीत परिपत्रकानुसार अपघात नुकसान भरपाई देण्यात येते परंतू रा. प. महामंडळाच्या ठरावानुसार अपघातात मृत व्यक्तींच्या अवलंबितास रा. प. महामंडळामध्ये नोकरी देण्याचे धोरण नाही.

-----------------

**मौजे अडूर-कोंडकारूळ (ता.गुहागर, जि. रत्नागिरी) येथील एका तरुणाचा मृत्यू झाल्याबाबत**

**(११)** * **११३३९ श्री.भास्कर जाधव (गुहागर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे अडूर-कोंडकारूळ (ता.गुहागर, जि.रत्नागिरी) येथील श्री.कमलेश तानाजी धोपावकर व त्याचे सहकारी एकवीरा देवीच्या दर्शनासाठी लोणावळा येथे गेले असता तेथील स्थानिकांबरोबर झालेल्या क्षुल्लक भांडणातून त्यांच्यावर धारधार शस्त्रांनी केलेल्या हल्ल्यात त्याचा मृत्यू होऊन त्याचे अन्य सहकारी गंभीर जखमी झाल्याची घटना दिनांक २५ मे, २०२५ रोजी घडली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर दुर्घटनेतील तरुणाच्या मृत्यूमुळे त्याच्या कुटुंबावर फार मोठे संकट ओढवल्याने सदर कुटुंबाला शासनाने विशेष बाब म्हणून आर्थिक सहाय्य करावे, अशी मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी दिनांक २८ मे २०२५ रोजी मा.मुख्यमंत्री महोदयांकडे पत्राद्वारे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीत काय निष्पन्न झाले व त्या अनुषंगाने संबंधितांविरुद्ध कारवाई करण्यासह मृत तरुणाच्या कुटुंबियांना आर्थिक मदत करण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) असल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) हे खरे आहे.

मौजे दहीवली, ता. मावळ, जि. पुणे येथे दिनांक २५.०५.२०२५ रोजी, फिर्यादी व त्याचे सहकारी आणि आरोपी यांच्यात झालेल्या किरकोळ भांडणाच्या रागातून आरोपींनी फिर्यादी व त्यांचे सहकारी यांस शिवीगाळ करून लोखंडी रॉड, लाकडी बांबूने मारहाण केली. सदर मारहाणीमध्ये फिर्यादी जखमी झाला असून एका सहकाऱ्याचा मृत्यू झाला आहे.

(२) हे खरे आहे.

(३) सदर गुन्ह्याच्या अनुषंगाने, भारतीय न्याय संहिता २०२३ चे कलम १०३(१), १०९, ११८(१), ११५(२), १२६(२), ३५१(२), ३५२, १८९(२), १९०, १९१(३), १९१(२) अन्वये लोणावळा पोलीस स्टेशन येथे दिनांक २६.०५.२०२५ रोजी अप.क्र. १३६/२०२५ नोंद करण्यात आला आहे. सदर गुन्ह्याच्या तपासात एकूण ७ आरोपी निष्पन्न झालेले असून त्यापैकी ०५ आरोपी न्यायालयीन कोठडीमध्ये आहेत. उर्वरीत २ आरोपींचा शोध सुरू आहे. सदर गुन्ह्याचा पुढील तपास चालू आहे.

स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी दिनांक २८ मे २०२५ रोजी मा.मुख्यमंत्री महोदयांकडे केलेल्या विनंतीच्या अनुषंगाने मुख्यमंत्री सहायता निधी कक्षाद्वारे कार्यवाही सुरू आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मालेगांव (जि.नाशिक) शहरातील बजरंगवाडी परिसरात राहणाऱ्या तरुणाचा विजेचा शॉक लागून झालेला मृत्यू

**(१२) * १३२४० श्री.मुफती मोहम्मद इस्माईल अब्दुल खालीक (मालेगांव मध्य) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मालेगांव (जि.नाशिक) शहरात विजेच्या तारांचे सुनियोजन नसल्यामुळे वारंवार विजेचा शॉक लागून अपघात व मृत्यूच्या घटना घडत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शहरातील बजरंगवाडी परिसरात राहणारा मोहम्मद आमिल मोहम्मद या २९ वर्षीय तरुणाचा विजेचा शॉक लागून दिनांक १ मे, २०२५ रोजी मृत्यू झाला असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी करुन मृताच्या नातेवाईकांना आर्थिक मदत देण्यासह विजेच्या तारांचे सुनियोजन करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) हे अंशत: खरे आहे.
मालेगांव शहरात एकूण ३३ अपघातामध्ये मालेगांव पॉवर सप्लाय लिमिटेड (MPSL) कंपनीस जबाबदार धरण्यात आले आहे.
(२) हे खरे नाही.
श्री. मोहम्मद आमिल मोहम्मद यांचा घराच्या पत्र्यावर साफसफाई करीत असताना अचानक मृत्यू झाला आहे. त्याबाबत आझाद नगर पोलीस ठाण्यात अकस्मात मृत्यू म्हणून नोंद झाली आहे. मयताचे शवविच्छेदन मालेगाव शासकीय रुग्णालय, मालेगाव येथे दि.०१/०६/२०२५ रोजी करण्यात आले आहे. सदर वैद्यकीय शवविच्छेदन अहवालात वैद्यकीय अधिकारी मालेगाव ग्रामीण रुग्णालय यांनी मयतास मरण हे हृदय विकाराचा तीव्र झटका या कारणाने आले आहे असा अभिप्राय दिला आहे.
(३) सदर अपघात हा विद्युत कारणामुळे घडला नसल्याने त्याचे नातेवाईकांना प्रचलित नियमाप्रमाणे मालेगांव पॉवर सप्लाय लिमिटेड (MPSL) कंपनी मार्फत आर्थिक मदत देय नाही.
मालेगाव शहर विभागासाठी दि.०१.०३.२०२० पासून मालेगांव पॉवर सप्लाय लिमिटेड (MPSL) या कंपनीची फ्रेन्चाईसी म्हणून महावितरणतर्फे नियुक्ती करण्यात आली आहे. मालेगाव वितरण फ्रेन्चाईजी विभागात वीज वितरण हानी कमी करण्यासाठी व ग्राहकाना दर्जेदार सुविधा पुरविण्यासाठी मे एम पी एस एल यांच्यातर्फे फ्रेन्चाईसी हस्तांतरणानतर, पायाभूत सुविधा उभारण्यासाठी सुमारे रु. ५९.८० कोटीची गुंतवणुक करण्यात आली आहे व काही काम प्रगतीपथावर आहेत. मालेगाव शहरात उच्चदाब वाहिनी २८ कि.मी बदलण्यात आली आहे. तसेच लघुदाब वाहिनी २२ कि.मी. बदलण्यात आली आहे आणि जीर्ण तारा बदलून ३८ कि मी नवीन एबी केबल टाकण्यात आली आहे. ग्राहकाना सुरळीत वीजपुरवठा करण्यासाठी नवीन २६४ रोहित्र वाढविण्यात आले आहे. तसेच १०४ रोहित्रांची क्षमतावाढ करण्यात आली आहे. जिर्ण झालेले ३०१२ विद्युत खांब सुध्दा बदलण्यात आले आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**राज्यातील हरित हायड्रोजन प्रकल्पाचे काम हरियाणातील हायजेनको या कंपनीला दिल्याबाबत**

**(१३) * १०९७० डॉ.बाबासाहेब देशमुख (सांगोले) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्याने स्वतःचे हरित हायड्रोजन धोरण तयार केले असून या उत्पादनाच्या नावाने हरियाणातील हायजेनको या कंपनीला या क्षेत्रातील कोणताही अनुभव नसताना संभाजीनगर मधील कोट्यवधी रुपयांच्या प्रकल्पाचे काम देण्यात आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यात औद्योगिकीकरण आणि शेतीसाठी मोठ्या प्रमाणावर विजेची मागणी वाढली असताना महाराष्ट्र हरित हायड्रोजन धोरण, २०२३ ची अंमलबजावणी करण्यासाठी ऊर्जा विभागामार्फत समिती नेमण्यात आली होती, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सरकारी कंपनी असणाऱ्या महाजेनको एचपीसीएल पुणे, यांच्या प्रस्तावांकडे दुर्लक्ष करून हायड्रोजन क्षेत्रातील कोणताही अनुभव नसलेल्या आणि या संदर्भातील महाराष्ट्र राज्याचे धोरण निश्चितीआधी म्हणजेच सन २०२२ मध्ये हरियाणात स्थापन झालेल्या हायजेनको कंपनीची निवड करण्यात आली, हे ही खरे आहे काय,

(४) तसेच हायजेनको ग्रीन एनर्जी लिमिटेड या कंपनीची हे काम करण्याची क्षमता आहे की नाही याची तपासणी करण्यासाठी तज्ञ समिती नेमण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी करुन राज्याचे हरित हायड्रोजन धोरण ठरविण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) हे खरे नाही.

तथापि, शासन निर्णय, उद्योग, ऊर्जा, कामगार व खनिकर्म विभाग, दिनांक १७.१०.२०२३ अन्वये राज्याचे महाराष्ट्र हरित हायड्रोजन धोरण-२०२३ जाहिर करण्यात आले आहे. सदर धोरणामध्ये शासन शुध्दीपत्रक, दिनांक ३०.०९.२०२४ व दिनांक २७.०५.२०२५ अन्वये सुधारणा करण्यात आली आहे.

(२) हे अंशत: खरे आहे.

महाराष्ट्र हरित हायड्रोजन धोरण-२०२३ ची अंमलबजावणी करण्यासाठी, धोरणातंर्गतच्या हरित हायड्रोजन प्रकल्पांना येणाऱ्या अडचणींचे निराकरण होण्यासाठी तसेच, सदर धोरणाचा नियमित आढावा घेण्यासाठी अपर मुख्य सचिव (ऊर्जा) यांच्या अध्यक्षतेखाली कार्यकारी समितीची स्थापना या धोरणातंर्गत करण्यात आली आहे.

(३) हे खरे नाही.

महाराष्ट्र हरित हायड्रोजन धोरण-२०२३ मधील तरतूदींनुसार महाऊर्जा कार्यालयाने दिनांक ३० एप्रिल, २०२५ रोजी प्रकल्प निवडीसाठी निविदा प्रसिध्द केलेली आहे. त्यामध्ये सार्वजनिक उपक्रम तसेच खाजगी विकासक सहभागी होऊ शकतात. सदर निविदा प्रक्रिया अद्याप पूर्ण झालेली नाही.

हायजेनको ग्रीन एनर्जी लिमिटेड या कंपनीस ऊर्जा विभागाने राज्याचे हरित हायड्रोजन धोरण जाहीर होण्यापूर्वी अथवा जाहिर झाल्यानंतर अद्यापपर्यंत कोणत्याही हरित हायड्रोजन प्रकल्पाचे काम दिलेले नाही.

(४) हे खरे नाही.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## तुळजापूर (जि.धाराशिव) येथील मुख्य बस स्थानकाचे चुकीचे आरेखन झाल्याने निधीचा झालेला अपव्यय

**(१४) * १२०७८ श्री.कैलास घाडगे पाटील (धाराशिव) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) तुळजापूर (जि.धाराशिव) येथील मुख्य बसस्थानकाची जुनी इमारत पाडून त्याठिकाणी नविन इमारतीचे बांधकाम करण्यात आलेले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरील बांधकामाचे आरेखन चुकीच्या पद्धतीने झाल्याने पहिल्याच पावसात बसस्थानकात पाणी शिरल्याने प्रवाशांना बसण्यासाठी योग्य जागा नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदरील चुकीचे आरेखन मंजूर करणारे अधिकारी व कंत्राटदार यांच्यामुळे शासनाच्या निधीचा अपव्यय झाला आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन बस स्थानकाचे चुकीचे आरेखन करणारे आरेखक, आरेखन मंजूर करणारे अधिकारी व कंत्राटदार यांच्यावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रताप सरनाईक :** (१) होय.
(२) रा. प. महामंडळाचे बांधकाम खात्यातील वास्तुशास्त्रज्ञांकडून तपासणी करण्यात आलेली असता आरेखनात चुक आढळून आलेली नाही. बसस्थानकाच्या मागील बाजूस बसस्थानक छतालगतचे पावसाळी छज्जा बसविण्याचे काम अपुर्ण असताना अवकाळी पाऊस आल्याने बसस्थानकातील प्रवाशी जागेत पाणी जमा झाले होते.
(३) नाही.
(४) व (५) बसस्थानक छतालगतचे पावसाळी छज्जा बसविण्याचे प्रलंबीत काम पूर्ण करून घेण्यात आलेले आहे.

-----------------

## सांगली जिल्ह्यातील कारागृहात कैद्यांना बाहेरच्या वस्तुंचा पुरवठा होत असल्याबाबत

**(१५) * ७८६२ श्री.विश्वजित कदम (पलूस कडेगाव), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.संजय मेश्राम (उमरेड) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सांगली जिल्ह्यातील कारागृहात कैद्यांना गांजा, दारु, मटण तसेच मावा पुरवठा केल्याचे माहे मे, २०२५ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त कारागृहातील कैद्यांना अशा प्रकारे कारागृहाबाहेरून वस्तूचा पुरवठा होत असल्यामुळे कारागृहातील सुरक्षिततेचा प्रश्न निर्माण झाला असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी करण्यात आली काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने संबंधितांविरुद्ध कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) हे खरे नाही.

तथापि, माहे मे, २०२५ मध्ये अज्ञात इसमाने सांगली जिल्हा कारागृहाच्या तटावरून प्लास्टिकची बाटली आत फेकून खोडसाळपणा केला होता.

(२) उक्त प्रकरणी सांगली जिल्हा कारागृहाच्या सतर्कतेमुळे तत्पर दखल घेवून आवश्यक कार्यवाही करण्यात आल्यामुळे कारागृहातील सुरक्षिततेला कोणताही धोका निर्माण झालेला नाही. तसेच कारागृहात बाहेरच्या वस्तुंचा पुरवठा होऊ नये यासाठी आवश्यक त्या उपाययोजना करण्यात येतात.
(३) माहे मे, २०२५ मध्ये अज्ञात इसमाकडून सांगली जिल्हा कारागृहाच्या तटावरून प्लास्टिकची बाटली आत फेकण्याचा प्रकार घडला होता. या घटनेबाबत कारागृह प्रशासनाने सांगली शहर पोलीस ठाणे यांच्याशी पत्रव्यवहार करून चौकशी केली होती. पोलिसांनी सदर बाटलीचा पंचनामा केला असून त्यामध्ये कोणतीही आक्षेपार्ह अथवा अवैध वस्तू आढळून आलेली नाही. त्यामुळे सदर प्रकरणी कोणताही अधिकारी किंवा कर्मचारी कसूरदार न आढळल्याने त्यांच्याविरुद्ध कोणतीही शिस्तभंगात्मक कार्यवाहीचा प्रश्न उद्भवत नाही.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## यवतमाळ जिल्ह्यातील युवा शक्ती बहुउद्देशीय विकास संस्थेच्या माध्यमातून सामाजिक कामांचे प्रलोभन देऊन एका संस्था चालकाची केलेली फसवणूक

**(१६) * ९७८९ श्री.संजय देरकर (वणी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) यवतमाळ जिल्ह्यातील युवा शक्ती बहुउद्देशीय विकास संस्थेच्या माध्यमातून सामाजिक कार्य करणाऱ्या एका संस्था चालकांना सामाजिक कामांचे प्रलोभन देऊन त्याची सुमारे २७ लाख रुपयांची फसवणूक केली असल्याचे माहे मे, २०२५ मध्ये निदर्शनास आल्यानंतर यवतमाळ पोलीस ठाण्यात तक्रार दाखल करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त बहुउद्देशीय संस्थेने बायो चूल प्रकल्प व इतर सामाजिक कामांचे प्रलोभन देऊन माहे जून ते ऑक्टोबर, २०२४ या कालावधीत एचपीएल आणि ईईएसएल या कंपन्यांसोबत करार केला होता, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर प्रकरणी चौकशी केली असता अशा नावाची कोणतीही कंपनी अस्तित्वात नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदर प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने संबंधितांविरुद्ध कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?,

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) हे खरे आहे.

आरोपींनी फिर्यादीचा विश्वास संपादन करुन बायो चुल प्रकल्प तसेच इतर सामाजिक कामांचे प्रलोभन दाखवुन २७ लाख रुपये घेऊन करारानुसार तक्रारदारास ८ लाख बायो चूल पाठविण्याऐवजी फक्त ८३५ बायो चूल पाठवून फसवणुक केल्याबाबत प्राप्त फिर्यादीवरून पो.स्टे. यवतमाळ शहर येथे दि.०३/०५/२०२५ रोजी भारतीय न्याय संहिता कलम ३१८(४) अन्वये अप.क्र.५२४/२०२५ नोंद करण्यात आला आहे.
(२) व (३) हे खरे नाही.

सदर प्रकरणातील आरोपीने बायो चूल प्रकल्पाच्या अनुषंगाने एच.पी.एल. आणि ई.ई.एस.एल. (नोएडा-उत्तर प्रदेश) या कंपन्यासोबत करार केला होता. सदर कंपन्या सोनिपत (हरियाणा) येथे स्थलांतरीत झालेल्या आहेत.
(४) सदर प्रकरणी फसवणुकीचा गुन्हा नोंद करुन आरोपींना ताब्यात घेऊन विचारपुस केली असता एच.पी.एल. आणि ई.ई.एस.एल या कंपन्या स्थलांतरीत झाल्यामुळे बायो चूल पूरवठा करण्यास वेळ लागणार असल्याने, फिर्यादी सदरची योजना घेण्यास तयार नसल्यामुळे आरोपीने फिर्यादीस रु.१० लक्ष परत दिले आहेत.

तपासाअंती बायो चूल मिळण्यास विलंब होत असल्याने फसवणुक झाल्याच्या गैरसमजामधून फिर्यादीने आरोपीविरुद्ध तक्रार दिल्याचे निष्पन्न झाल्याने तक्रारदाराच्या सहमतीने मा.न्यायालयात "क" फायनल क्रमांक ४८/२०२५ अन्वये अंतिम अहवाल सादर करण्यात आला आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## पालघर जिल्ह्यातील वसई-विरार शहर महानगरपालिका क्षेत्रात महावितरणच्या भूमीगत विद्युत वाहिन्यांची कामे पूर्ण करण्याबाबत

**(१७)** * **१२५१८ श्रीमती स्नेहा दुबे (वसई) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वसई (जि.पालघर) तालुक्यातील मर्सेस रानशेत वाडी भागात तुटलेल्या विद्युत वाहक तारेचा स्पर्श होऊन कु.सुरज कुमार या तरूणाचा दिनांक २६ मे, २०२५ रोजी तसेच विरार (पश्चिम) येथील अर्नाळा धसपाडा येथे विद्युत रोहित्राची दुरूस्ती करताना श्री.जयेश घरत या बाह्यस्त्रोतावर काम करणाऱ्या कर्मचाऱ्याचा वीजेचा धक्का लागून दिनांक ३० मे, २०२५ रोजी मृत्यू झाल्याची घटना घडली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, संपूर्ण वसई-विरार शहर महानगरपालिका क्षेत्रात महावितरणच्या ओव्हरहेड वीज वाहिन्या तुटून झालेल्या जिवितहानीच्या पार्श्वभूमीवर महावितरणच्या वसई मंडळातील ओव्हरहेड केबल भूमीगत करण्याच्या प्रस्तावाला मान्यता देण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी माहे डिसेंबर २०२४ मधील अधिवेशनात केली असून, तत्संदर्भात तातडीने कार्यवाही करण्यासाठी स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक १५ फेब्रुवारी, २०२५ रोजी शासनाला निवेदन सादर केले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी महसूल विभागांतर्गत आपत्ती व्यवस्थापन उप विभागाने वसई तालुक्यातील महावितरणच्या वसई मंडळांतर्गत भूमीगत विद्युत वाहिन्यांची कामे करण्यासाठी रु.२११ कोटी रुपयांचा प्रस्तावाला दिनांक ४ मार्च, २०२५ रोजी मान्यता देऊनही अद्याप ही कामे सुरू करण्यात आलेली नाहीत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी करुन सदरहू कामे तातडीने पुर्णत्वास नेऊन या दुर्घटनेमध्ये मृत्युमुखी पडलेल्या व्यक्तींच्या कुटुंबियांना आर्थिक मदत देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१), (२) व (३) हे खरे आहे.

दि.२४.०५.२०२५ रोजी कु.सुरज कुमार यांचा पोल क्र.२ व ३ मधील बी फेज सवाहक तुटून पडलेल्या तारेच्या संपर्कात येवून वीजेचा धक्का लागून प्राणांतिक अपघात झाला आहे. तसेच अर्नाळा धसपाडा येथे रोहित्राच्या डी.ओ.सेट चा आर.फेज.चा पोस्ट इन्शुलेटर पंक्चर झाल्याने तो बदलण्याचे काम झाल्यानंतर अज्ञात ग्राहकाच्या जनरेटर संच मांडणी मधून वीज प्रवाह आल्याने कै. जयेश घरत या बाह्यस्त्रोतावर काम करणारे कर्मचारी यांचा ३०.०६.२०२५ रोजी प्राणांतिक अपघात झाला आहे.

महावितरणच्या वसई मंडळातील ओव्हरहेड केबल भूमीगत करण्याच्या प्रस्तावाला मान्यता देण्याची मागणी माहे डिसेबर २०२४ च्या अधिवेशनात स्थानिक लोकप्रतिनिधींव्दारे करण्यात आली होती.

वसई मंडळांतर्गत भूमीगत विद्युत वाहिन्यांचे कामे पूर्ण करण्यासाठी कोकण आपत्ती सौम्यीकरण प्रकल्पाअंतर्गत रु.२११.५५ कोटींच्या प्रकल्प अहवाल प्रस्तावास शासन निर्णय दि.०४.०३.२०२५ नुसार मंजूरी देण्यात आली आहे. उपरी तारमार्ग वाहिन्या भूमीगत करण्यासाठी निविदा काढून कंत्राटदारास निविदा वितरीत केल्यानंतर तातडीने कामे हाती घेण्यात येणार आहेत.

(४) सदर दुर्घटनेमध्ये मृत्युमुखी पडलेल्या कु.सुरज कुमार यांच्या कुटुंबियांना महावितरणमार्फत रु.४.०० लाख ची आर्थिक मदत दि.१३.०६.२०२५ रोजी देण्यात आली आहे.

तसेच बाह्यस्त्रोत कर्मचारी कै. जयेश घरत यांच्या कुटूंबियांना मे.जी.के.एंटरप्राईजेस यांचेकडून रु.४.०० लाख ची आर्थिक मदत दि.२४.०६.२०२५ रोजी देण्यात आली आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**तलासरी (जि.पालघर) तालुक्यातील भारतीय स्टेट बँकेच्या कर्मचाऱ्यांनी महिला बचत गटाच्या नावे परस्पर कर्ज काढून केलेला गैरव्यवहार**

**(१८) * १४०९५ श्री.हरिश्चंद्र भोये (विक्रमगड) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय:-

(१) तलासरी (जि.पालघर) तालुक्यातील भारतीय स्टेट बँक या राष्ट्रीयकृत बँकेतील कर्मचाऱ्यांनी महिला बचत गटाच्या नावे परस्पर कर्ज काढून फसवणूक केल्याचे माहे मार्च, २०२५ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी तलासरी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्या अनुषंगाने संबंधिताविरुद्ध कोणती कारवाई केली आहे वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय, हे खरे आहे.

सदर प्रकरणी तलासरी पोलीस ठाणे येथे दि.०६.०३.२०२५ रोजी तक्रार अर्ज प्राप्त झालेला असून स्था.अर्ज. क्र.३५/२०२५ अन्वये नोंद केला आहे.

(२) उक्त प्रकरणी तलासरी पोलीस ठाण्यात अद्यापपर्यंत गुन्हा दाखल करण्यात आलेला नाही.

(३) उक्त तक्रार अर्जाच्या अनुषंगाने तलासरी पोलीस ठाणे यांनी दि.१३.०३.२०२५ रोजीच्या पत्रान्वये स्टेट बॅंक ऑफ इंडीया, शाखा तलासरी यांच्याकडून संबंधित बॅंक कर्मचाऱ्यांचे पूर्ण नाव, पत्ते, संपर्क क्रमांक व सद्याची नेमणूक इत्यादी माहिती उपलब्ध करुन घेतली आहे. तसेच सदर तक्रारीबाबत स्टेट बँक ऑफ इंडियाचे वरिष्ठ अधिकारी, मा. प्रादेशिक व्यवसायिक कार्यालय, भाईंदर, जि. ठाणे, यांनी दि.२५.०६.२०२५ रोजीच्या पत्रान्वये बँक मॅनेजर व लोन डिपार्टमेन्टचे कर्मचारी यांची चौकशी सुरू असल्याचे कळविले आहे. तसेच उक्त प्रकरणी अर्जदार यांनी दि.१९.०३.२०२५ रोजी प्राप्त माहितीने त्यांचे समाधान झाल्याने बँकेच्या चौकशीच्या अधिन राहून त्यांनी तलासरी पोलीस स्टेशनला दिलेला तक्रारी अर्ज दप्तरी दाखल करण्यास हरकत नसल्याबाबत जबाब दिला आहे. स्टेट बॅंक ऑफ इंडीयाच्या चौकशी अहवालानंतर पुढील कार्यवाही करण्याची तजवीज ठेवण्यात आली आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**राज्यात राबविण्यात येत असलेल्या लाडकी बहिण योजनेच्या नावाने बनावट बँक खाते तयार केल्याबाबत**

**(१९) * ९५९६ श्रीमती देवयानी फरांदे (नाशिक मध्य), श्री.धर्मरावबाबा आत्राम (अहेरी), श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी), श्री.अभिमन्यु पवार (औसा), श्री.रईस शेख (भिवंडी पूर्व), श्री.संजय केळकर (ठाणे), श्री.प्रशांत**

**ठाकूर (पनवेल), श्री.अनिल पाटील (अमळनेर), श्री.राम कदम (घाटकोपर पश्चिम), श्री.विठ्ठल लंघे (नेवासा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात राबविण्यात येत असलेल्या लाडकी बहिण योजनेच्या नावाने सर्वसामान्य नागरीकांची बनावट बँक खाती तयार करुन त्याचा सायबर गुन्हयांसाठी वापर करणाऱ्या टोळीचा छडा पोलिसांनी लावल्याचे माहे मे, २०२५ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मुंबईतील मानखुर्द, देवनार, डीएन नगर, धारावी येथील शेकडो महिलांना मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण या योजनेचा लाभ देण्याचे अमिष दाखवून बनावट कागदपत्रांद्वारे खाजगी वित्त संस्थांकडून परस्पर कर्ज काढून या महिलांची फसवणूक केली असल्याची तक्रार मानखुर्द व जुहू पोलीस ठाण्यातंर्गत माहे एप्रिल, २०२५ मध्ये नोंदविण्यात आली असून या रॅकेटचा मुख्य सुत्रधार प्रतीक पाटील हा व्यक्ती असून तो फरार असल्याचे माहे मे, २०२५ मध्ये निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच सदरहु आरोपींनी सुमारे २५०० बँक खाती उघडली असुन त्याद्वारे १९ लाख ४३ हजार रुपये निधी घेवून शासनाची फसवणुक केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी कली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने बनावट खाती उघडणाऱ्या संबंधितांविरुद्ध कारवाई करुन लाडक्या बहिणीच्या नावे काढलेले कर्ज रद्द करून खाजगी वित्त संस्थांकडून अशा घटनांची पुनरावृत्ती टाळण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय, हे अंशत: खरे आहे.

राज्यात राबविण्यात येत असलेल्या लाडकी बहिण योजनेच्या नावाने सर्वसामान्य नागरीकांची बनावट बॅक खाती तयार करून केलेल्या फसवणुकीच्या संदर्भात मुंबई शहर येथे एप्रिल, २०२५ च्या दरम्यान ०२, गुन्हे दाखल आहेत.

तसेच, उक्त गुन्ह्याव्यतिरिक्त पोलीस अधीक्षक, सातारा यांच्या कार्यक्षेत्रांतर्गत ०१, पोलीस आयुक्त, सोलापूर शहर यांच्या कार्यक्षेत्रांतर्गत ०१, पोलीस अधीक्षक, सोलापूर ग्रामीण यांच्या कार्यक्षेत्रांतर्गत ०१ व पोलीस अधीक्षक, नांदेड यांच्या कार्यक्षेत्रांतर्गत ०१ गुन्हे दाखल आहेत.

(२) ६५ गरीब झोपडपट्टी ग्राहकांची कागदपत्रे घेऊन बजाज फायनास या खाजगी वित्त संस्थेकडून परस्पर कर्ज काढून कंपनीची व त्या झोपडपट्टी ग्राहकांची फसवणूक केली असल्याने मानखुर्द पोलीस ठाणे येथे दिनांक ०६.०४.२०२५ रोजी गु.र.क्र. २०२/२०२५ मध्ये भारतीय न्यायसंहिता, २०२३ मधील कलम ३१८(४), ३(५), अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून त्यामध्ये ०५ आरोपींना अटक करण्यात आली आहे.

तसेच, जुहू पोलीस ठाणे, बृहन्मुंबई शहर येथे दिनांक १५.०२.२०२५ रोजी गु.र.क्र. १७१/२०२५ मध्ये भारतीय न्याय संहिता, २०२३ मधील कलम ३१८(४), ३(५) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून या गुन्हयात प्रतीक पटेल नावाचा इसम फरार आहे.

(३) जुहू पोलीस ठाणे, बृहन्मुंबई शहर येथील गु.र.क्र. १७१/२०२५ या गुन्ह्याच्या तपासामध्ये एकूण १०४ बँक खाती उघडकीस आली असून रु.१९,४३,७७९/- इतकी रक्कम होल्ड केली आहे. उक्त  गुन्हयामधील सर्व बँक खाती व बँक खातेधारक खरे आहेत. नमुद बँक खाते धारकांना प्रत्येक १०००/- रूपये देवून त्यांची बँक खाती आरोपींनी खरेदी केली आहेत. नमुद गुन्हयातील महिला बँक खातेधारकांच्या कागदपत्रांचा खोटे कर्ज प्रकरणासाठी वापर केल्याचा कोणताही प्रकार अदयाप समोर आलेला नाही.

(४) उक्त प्रकारच्या फसवणुक रोखण्यासाठी महाराष्ट्र सायबर तसेच सर्व पोलीस घटकांकडुन त्यांच्या हद्दीत जनजागृती कार्यक्रम राबविण्यात आलेले आहेत. तसेच ॲडव्हायझरी सोशल मिडिया प्लॅटफॉर्मवर प्रसिद्ध करण्यात आलेले आहेत. सायबर गुन्हयांबाबत लोकांना जागरुक करून गुन्हे रोखण्याकरीता पोलीस प्रशासन, न्यायवैज्ञानिक सहाय्यक संस्था आणि न्यायप्रणालीतील संस्थांच्या अधिकारी/कर्मचारी यांना सायबर गुन्ह्यांच्या अनुषंगाने अत्याधुनिक प्रशिक्षण देण्यात आले आहे. तसेच गुन्ह्यांचा तपास जलद गतीने करणे आणि न्यायीक प्रक्रियेला गती देण्याचे शासनाचे धोरण आहे. मुंबई शहर आयुक्तालय येथे प्रादेशिक स्तरावर पाच सायबर पोलीस ठाणे उभारण्यात आले असून एकूण ५० सायबर पोलीस ठाणे कार्यान्वित आहेत. तसेच National Cyber Crime Reporting Portal सुरु करण्यात आले आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## बारामती (जि.पुणे) येथील एका बोगस व्यक्तीने उद्योजक व शासनाच्या सेवेतील अधिकाऱ्यांची केलेली फसवणूक

**(२०) * ८५२२ श्री.मनोज जामसुतकर (भायखळा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) बारामती (जि.पुणे) येथील एका बोगस व्यक्तीने विद्यानंद डेअरी फर्मसह अनेक कंपन्या स्थापित करुन मोठे उद्योजक असल्याचे भासवून मुंबई व पुण्यातील अनेक उद्योजकांसह शासनाच्या सेवेतील अनेक उच्च पदस्थ अधिकाऱ्यांची फसवणूक केली असल्याचे माहे एप्रिल, २०२५ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर प्रकरणी एका अधिकाऱ्याने मुंबईच्या आर्थिक गुन्हे शाखेकडे माहे मे, २०२५ मध्ये तक्रार दाखल केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने संबंधितांविरुद्ध कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय, हे अंशत: खरे आहे.

सदर फसवणूक प्रकरणी अंबोली पोलीस ठाणे, बृहन्मुंबई शहर येथे दि.३०.०४.२०२५ रोजी गु.र.क्र. ४३९/२०२५, भारतीय न्यायसंहिता, २०२३ कलम ३१६ (२), ३१८ (४) अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

तसेच बारामती तालुका पोलीस ठाणे, येथे दि.१५.०५.२०२५ रोजी गु.र.क्र.१९४/२०२५, भारतीय न्याय संहिता कलम ३१६ (२), ३१८ (४), ११९ (१), ३२४ (२),३५१(२)(३) सह अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमाती (अत्याचार प्रतिबंधक) अधिनियम १९८९, मधील कलम ३(१४भार एस.) २ (२)(व्हीए), २(१)(पप), ३(१)(सी) अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.
(२) कोणत्याही अधिकाऱ्याची फसवणूक झाले प्रकरणी आर्थिक गुन्हे विभाग, मुंबई यांच्या कार्यालयात तक्रार केल्याची नोंद नाही.
(३) याप्रकरणी दाखल गुन्ह्यातील आरोपीस दि.३१.०५.२०२५ रोजी अटक करण्यात आली असून आरोपी मा.न्यायालयीन कोठडीत आहे. फिर्यादी व आरोपी यांच्यातील व्यवहाराची माहिती बॅंक खात्याच्या विवरणपत्रातून मिळाली असून सदर गुन्ह्याचा तपास सुरु आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**अहिल्यानगर महानगरपालिकेतील १५ व्या वित्त आयोगाच्या निधीमध्ये केलेला गैरव्यवहार**

**(२१) * १३०१४ श्री.संग्राम जगताप (अहिल्यानगर शहर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अहिल्यानगर महानगरपालिकेतील श्री.विजयकुमार महादेव रणदिवे हे शहर लेखा व्यवस्थापक, राष्ट्रीय आरोग्य अभियान या पदावर कंत्राटी पद्धतीने तात्पुरत्या स्वरुपात कार्यरत असतांना, त्यांनी आपल्या पदाचा गैरवापर करुन १५ व्या वित्त आयोगाकडून प्राप्त झालेला निधी स्वत:च्या खात्यावर वळवून गैरव्यवहार केला असल्याने त्यांना दिनांक १२ फेब्रुवारी, २०२५ रोजी अटक करण्यात आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी केलेल्या गैरव्यवहारामध्ये श्री.रणदिवे यांच्याशी महानगरपालिकेतील डॉ.अनिल बोरगे, वैद्यकीय आरोग्य अधिकारी यांनी संगनमत केल्याने त्यांच्यावर कायदेशीर फिर्याद नोंदवून गुन्हा दाखल करण्यात आला असतांना देखील त्यांचे नाव गुन्ह्यातून वगळण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने संबंधितांविरुद्ध कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय, हे खरे आहे.

श्री.विजयकुमार रणदिवे हे शहर लेखा व्यवस्थापक राष्ट्रीय आरोग्य अभियान या पदावर कंत्राटी पध्दतीने तात्पुरत्या स्वरूपात कार्यरत असताना त्यांनी आपल्या पदाचा गैरवापर करून १५ व्या वित आयोगाकडुन प्राप्त झालेला निधी ऑनलाईन प्रक्रियेद्वारे रुपये १६ लाख ५० हजार इतका निधी त्यांच्या वैयक्तिक बँक खात्यावर वर्ग करून निधीचा स्वत:च्या फायदयासाठी उपयोग केल्याचे निदर्शनास आल्यानंतर गुन्हा दाखल करुन त्यांना अटक करण्यात आली आहे.

(२) सदर प्रकरणी दि.१२.०२.२०२५ रोजी कोतवाली पोलीस स्टेशन येथे गुरनं ८८/२०२५ भा.दं.वि. कलम ३४, ४०९, ४२० प्रमाणे गुन्हा दाखल करून गुन्हयातील प्रथमदर्शी आरोपी क्र.१ श्री.विजयकुमार महादेव रणदिवे व आरोपी क्र.२ डॉ अनिल बोरगे यांना अटक करण्यात आली. सदर गुन्ह्यातील दोन्ही आरोपींना दि. १३.०२.२०२५ ते १७.०२.२०२५ पर्यंत पोलीस कस्टडीत ठेवण्यात आले. त्यानंतर आरोपी क्र.१ हे न्यायालयीन कस्टडीत असुन आरोपी क्र.२ यांना पोलीस कस्टडी संपल्यानंतर मा. न्यायालयाने जामीनावर मुक्त केले आहे.

सदर गुन्ह्याच्या चौकशीअंती आरोपी क्र.२ डॉ.अनिल बोरगे यांच्या विरूध्द कोणत्याही प्रकारचे सबळ पुरावे हस्तगत न झाल्याने व त्यांच्या विरूध्द मा.न्यायालयात दोषारोपत्र दाखल करण्या इतपत पुरावे न मिळाल्याने BNSS कलम १८९ अन्वये त्यांना सदर गुन्हयातून वगळण्यात आले आहे.

(३) सदर प्रकरणी चौकशी करण्यात आली असुन वरिल प्रमाणे गुन्हा नोंद करून गुन्ह्याच्या चौकशीअंती वर नमुद केलेल्या कारणास्तव आरोपी क्र.२ यांना गुन्हयातून वगळून आरोपी क्र.१ यांच्याविरूध्द गुन्हयाचे दोषारोपपत्र मा.न्यायालयात दि.११.०४.२०२५ रोजी दाखल करण्यात आले आहे.

तसेच सदर गुन्हयातील फिर्यादी यांनी मा. अति. मुख्य न्यायदंडाधिकारी वर्ग-१ यांच्या न्यायालयात अपिल दाखल केले असता मा.न्यायालयाने आरोपी क्र.२ डॉ.अनिल बोरगे यांच्या विरुध्द प्रोसेज ईशु करून सदर प्रकरणाची दि.२६.०६.२०२५ रोजी पुढील तारीख दिल्याने आरोपी क्र.२ यांनी सदर आदेशाविरूध्द मा.सत्र न्यायालय अहिल्यानगर येथे अपिल दाखल केले, मा.सत्र न्यायालयाने मा.अति मुख्य न्यायदंडाधिकारी वर्ग-१ यांच्या आदेशाला स्थगिती दिली असून पुढील सुनावणी दि. १७.०७.२०२५ रोजी ठेवण्यात आली आहे.

सद्यस्थितीत सदरचा खटला मा.न्यायालयात न्यायप्रविष्ठ आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## नाशिक येथील पोलिस विभागाची भाडे करारावरील जागा डायोसेशन कौन्सिल (एनडीसी) संस्थेने परस्पर विक्री करुन केलेला गैरव्यवहार

**(२२) * १४३२९ श्री.मोहन मते (नागपूर दक्षिण) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक येथील सन १९९० पासूनची पोलिस विभागाची भाडे करारावरील जागा मालकीची नसतानाही नाशिक डायोसेशन कौन्सिल (एनडीसी) नावाच्या संस्थेने परस्पर विक्री करुन यामध्ये सुमारे ३०० कोटी रुपयांची फसवणूक केल्याची बाब दिनांक ११ जून, २०२५ रोजी निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने संबंधितांविरुद्ध कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय, हे खरे आहे.

नाशिक येथील सन १९९० पासुन पोलीस विभागाकडे भाडे करारावर असलेली जागा सदरची मालमत्ता नाशिक डायोसेशन ट्रस्ट असोसिएशन प्रा.लि. (NDTA) या कंपनीच्या नावे असल्याचे माहित असुन सुध्दा नाशिक डायोसेशन कौन्सिल (NDC) नामक संस्थेने सदरच्या जागेची मालकी नसतांना नामसाधर्म्याचा फायदा घेवुन स्वत:ची मिळकत असल्याचे भासवुन प्रथम ती भाडेकरारावर दिली व नंतर त्या जागेची विक्री करण्यासाठी मा.धर्मादाय आयुक्तांची परवानगी प्राप्त करुन खरेदी करणाऱ्या विकासकांशी संगनमत करुन दोघांच्या आर्थिक लाभाकरिता परस्पर विक्री करुन अंदाजे ३०० कोटी रुपयांची फसवणुक केल्याची बाब प्रथमदर्शनी दिसुन आली आहे.

(२) होय.

सदर प्रकरणी चौकशी करण्यात आली असुन सरकारवाडा पोलीस स्टेशन येथे दि.११ जून, २०२५ रोजी गुन्हा रजि.नं. १६६/२०२५ भा.न्या.स. कलम ३१६(२), ३१६(५), ३१८(४), ३३६(२), ३३७, ३३८, ३३६(३), ३४०(२), २३६, २३७, ६१(२), ३(५) याप्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे.

सदर गुन्ह्यातील संबंधित सोळा आरोपींनी मा.न्यायालयात अटकपुर्व जामीन मिळण्याकामी अर्ज केला आहे, सदरील अटकपुर्व जामीन अर्जावरील निर्णय पुढील सुनावणी आदेशाच्या अधिन आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## सांगली जिल्ह्यातील खोतवाडी रस्त्यावर भरधाव वेगाने गाडी चालविल्यामुळे झालेला अपघात

**(२३) * ८६६५ श्री.सुधीर मुनगंटीवार (बल्लारपूर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सांगली जिल्ह्यातील खोतवाडी रस्त्यावर हिट अँड रन ची घटना दिनांक १५ मार्च, २०२५ रोजी रात्री साडे आठच्या सुमारास घडली असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी वाहनचालक श्री.नितेश पाटील या चालकाने रस्त्यावरील आठ ते दहा दुचाकीना उडवले असून, एका मोटार सायकलस्वाराला फरफटत नेले असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने संबंधितांविरुद्ध कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय, हे खरे आहे.

सांगली जिल्ह्यातील माधवनगर ते खोतवाडी रस्त्यावर दि.१५ मार्च, २०२५ रोजी रात्री ९ वाजेच्या सुमारास सदर घटना घडली आहे.

(२) हे अंशत: खरे आहे.

सदर गुन्ह्यातील आरोपी श्री.नितेश पाटील याने त्याच्या ताब्यातील फॉर्चुनर कार भरधाव वेगाने चालवुन माधवनगर ते खोतवाडी रस्त्यावर दोन वेगवेगळया ठिकाणी दोन मोटार सायकलस्वारांना धडक देवुन जखमी करुन जखमींना उपचाराकरीता घेऊन न जाता व पोलीसांना माहिती न देता पळून गेल्याचे निदर्शनास आले आहे.

तसेच सदर घटनेतील एका दुचाकीस पाठीमागुन धडक देऊन त्या दुचाकी वाहनास ५०० मीटर अंतरापर्यंत फरफटत नेल्याचे निदर्शनास आले आहे.

(३) होय, सदर प्रकरणी चौकशी करण्यात आली असून आरोपीस अटक करुन त्याविरुध्द सांगली ग्रामीण पोलीस स्टेशन येथे गु.र.नं. ८७/२०२५ भा.न्या.सं. कलम २८१, १२५(अ), १२५(ब), ३२४(४)(५), मोवाक १३४(अ), १८४ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

आरोपीचे रक्ताचे नमुने न्यायसहायक वैज्ञानिक प्रयोग शाळा कोल्हापुर यांचेकडुन प्राप्त झाले असून त्यामध्ये २ एम.एल. रक्तामध्ये ०.१०९ टक्के इथील अल्कोहोल असलेबाबतचा अहवाल मिळाला आहे.

सद्यस्थितीत सदर गुन्ह्याचा तपास पुर्ण झाला असुन दि.१७.०६.२०२५ रोजी मा.न्यायालयात दोषारोपपत्र दाखल करण्यात आले आहे.

(४) विलंब नाही.

-----------------

## भिवंडी (जि.ठाणे) गुन्हे शाखेने बनावट नोटा बनविणाऱ्या छापखान्यावर छापा टाकल्याबाबत

**(२४) * ९६४३ श्री.दौलत दरोडा (शहापूर), श्री.अनिल पाटील (अमळनेर), श्रीमती सुलभा खोडके (अमरावती) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे जिल्ह्यातील भिंवडी गुन्हे शाखेने बनावट नोटा बनविणाऱ्या छापखान्यावर कारवाई करुन दिनांक ८ मे, २०२५ रोजी सहा जणांना अटक केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अशा प्रकारे राज्यात अन्य ठिकाणी बनावट नोटा छपाई करण्याचे कारखाने आढळल्यास त्यांची देखील चौकशी करण्यात आली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने आतापर्यंत किती गुन्हेगारांना अटक करण्यात आली व त्यांच्याकडून किती नोटा जप्त करण्यात आल्या आहेत व त्यांच्याविरुद्ध कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय, हे खरे आहे.

ठाणे जिल्ह्यातील भिवंडी शांतीनगर येथे बनावट नोटा छापल्याप्रकरणी शांतीनगर पोलीस ठाणे, ठाणे शहर येथे दि.०४.०५.२०२५ रोजी गु.र.क्र.५१६/२०२५, भारतीय न्याय संहिता अधिनियम, २०२३ मधील कलम १७८(१), १८०, १८१, ३(५) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदर गुन्ह्यात एकूण सहा आरोपींना अटक केली आहे. सदर आरोपी मा.न्यायालयीन कोठडीत असून याबाबत पुढील तपास सुरु आहे.

(२) व (३) राज्यात अन्य ठिकाणी बनावट नोटा छापल्याप्रकरणी सन २०२४ ते जून, २०२५ दरम्यान एकूण १०२ गुन्हे दाखल असून त्यामध्ये २१६ आरोपींना अटक करण्यात आली असून ५७०२१ इतक्या बनावट नोटा जप्त करण्यात आल्या आहेत.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## पेरमिली (ता.अहेरी, जि.गडचिरोली) येथे महावितरणने नवीन विद्युत उपकेंद्राचे काम निकृष्ट दर्जाचे केल्याबाबत

**(२५) * १२३४८ श्री.धर्मरावबाबा आत्राम (अहेरी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पेरमिली (ता.अहेरी, जि.गडचिरोली) येथे महावितरणद्वारे नविन उपकेंद्राचे सुरु असलेले काम अत्यंत निकृष्ट दर्जाचे केल्याचे माहे मे, २०२५ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, विद्यूत उपकेंद्राच्या निकृष्ट दर्जाच्या कामाबाबत व अनियमिततेबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी व सामाजिक कार्यकर्ते यांनी अनेक तक्रारी केल्या असताना देखील महावितरणाचे अधिकारी दुर्लक्ष करीत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने सबंधितांविरुद्ध कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) हे खरे नाही.

पेरमिली (ता.अहेरी, जि.गडचिरोली) येथे आदिवासी उपयोजनेअंतर्गत ३३/११ के.व्ही. ५ एम.व्ही.ए. क्षमतेचे नविन उपकेंद्र मंजूर आहे. सदर उपकेंद्रांत ५ एम.व्ही.ए. क्षमतेचे १ रोहित्र,एकूण ९६ कि.मी. लांबीची ३३ के.व्ही. वीज वाहिनी व एकूण ०७ कि.मी लांबीची ११ के.व्ही वीज वाहिनीचे काम डिसेंबर, २०२४ मध्ये सुरु करण्यात आले असून, सध्या काम प्रगतीपथावर आहे.
(२) हे अंशतः खरे आहे.

पेरमिली विद्युत उपकेंद्राच्या कामाबद्दलची एक तक्रार आलापल्ली विभाग, महावितरण येथे प्राप्त झाली आहे.
(३) संबंधीत तक्रारीची शहानिशा करण्याचे आदेश दि.२६.०६.२०२५ रोजी कार्यकारी अभियंता, आलापल्ली विभाग यांना देण्यात आले आहेत. तक्रारीच्या अनुषंगाने प्राप्त होणाऱ्या अहवालानुसार कंत्राटदार दोषी आढळल्यास, कंत्राटदाराच्या विरुध्द निविदेच्या अटी व शर्तीनुसार कार्यवाही करण्यात येईल.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यात नोंदणीकृत वाहनांना हाय सिक्युरिटी नंबर प्लेट लावण्यास मुदतवाढ देण्याबाबत

**(२६) * ७२३२ श्री.धनंजय मुंडे (परळी), श्री.भिमराव (आण्णा) धोंडिबा तापकीर (खडकवासला), श्री.बापूसाहेब पठारे (वडगाव शेरी) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात २०१९ पूर्वी नोंदणीकृत वाहनांना हाई सिक्युरिटी नंबर प्लेट (HSRP) बसविण्यास अल्प प्रतिसाद तसेच केंद्र संख्या अल्प असल्याने वाहनधारकांचा वेळ व श्रम खर्ची पडत असुन वाहनधारकांत नाराजी पसरली असून बीड जिल्ह्यात ३ लाखांहून अधिक जुन्या वाहनांपैकी केवळ २४ टक्के वाहनांनाच हाई सिक्युरिटी नंबर प्लेट (HSRP) बसविण्यात आल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यात हाई सिक्युरिटी नंबर प्लेट लावण्याची अंतिम मुदत ३० जून, २०२५ पर्यंत असल्याचे सांगितले असताना, संबंधित अधिकृत संकेतस्थळावर (उदा. रोझमार्टा कंपनी) सप्टेंबरपर्यंत अपॉईंटमेंट मिळत असल्याने वाहनधारकांमध्ये संभ्रम निर्माण झाला असणे, तसेच वाहनधारकांकडून प्रतिसाद न मिळाल्यास मोठ्या प्रमाणावर दंडात्मक कारवाई करण्यात येणार असल्याचेही निर्दशनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) तसेच पुणे शहरात संबंधित वितरकाने नागरिकांना किंवा मुख्य वितरण यंत्रणेला कोणतीही पूर्वसूचना न देता एचएसआरपी बसविण्याची सेवा बंद केली असल्याने ऑनलाइन अर्ज करून अपॉइंटमेंट घेतलेले आणि फी भरलेले वाहनधारक मोठ्या प्रमाणावर अडचणीत आले असून नागरिकांनी भरलेले शुल्क पुन्हा वापरता येणार नसल्याने सदरहू रकमेची परतफेड होणार नाही, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे, त्यानुसार उक्त सेवेची मुदत वाढवून वाहनधारकांना दिलासा देण्यासह खंडितीमुळे वाहन मालकांना कायदेशीर दंड अथवा पोलीस कारवाईचा सामना करावा लागणार असल्याने वितरकांविरुद्ध किंवा संबंधित नियंत्रक यंत्रणेवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रताप सरनाईक :** (१) दिनांक ०१/०४/२०१९ पूर्वी नोंदणी झालेल्या बीड जिल्ह्यातील बीड व आंबेजोगाई परिवहन कार्यालयामध्ये एकूण २७,८९८ वाहनांना उच्च सुरक्षा नोंदणी पाटी (HSRP) बसविण्यात आली आहे.
(२) दिनांक ०१/०४/२०१९ पूर्वी नोंदणी झालेल्या वाहनांना उच्च सुरक्षा नोंदणी पाटी (HSRP) बसविण्यासाठी दिनांक १५.०८.२०२५ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे.
(३) व (४) पुणे परिवहन कार्यालयाच्या कार्यक्षेत्रातील ANURON ENTERPRISES PVT LTD. सिंहगड रोड, पुणे येथील फिटमेंट केंद्र बंद झाले होते. तथापि, सदर ठिकाणी HSRP नंबर प्लेटसाठी शुल्क भरलेल्या वाहन मालकांना नजीकच्या केंद्रावरील अपॉईंटमेंट देऊन HSRP नंबर प्लेट बसविण्याची कार्यवाही करण्यात आली आहे. प्रादेशिक परिवहन कार्यालय, पुणे येथे रोजमार्टा सेफ्टी सिस्टम्स लि. यांचा एक प्रतिनिधी पुर्णवेळ कार्यरत असून मदत कक्षाची स्थापना करण्यात आलेली आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## तुमसर-मोहाडी (जि.भंडारा) शहरामध्ये कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्याबाबत

**(२७)** * **१४३९५ श्री.राजू कारेमोरे (तुमसर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) तुमसर-मोहाडी (जि.भंडारा) शहरामध्ये गुंड प्रवृत्तीच्या लोकांचे प्रमाण वाढलेले असल्यामुळे संपूर्ण शहरात कायदा व सुव्यवस्था बिघडली असल्याचे माहे एप्रिल, २०२५ मध्ये निदर्शनास आलेले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, तुमसर शहरात अफू, चरस, गांजा यांची नशा करणे, रंगदारी करणे, क्रिकेटवर सट्टा लावणे (आयपीएल), सामुहिक टोळया बनवून हाणामारीचे प्रकार तसेच घरांवर हल्ले करुन लोकांना जीवे मारण्याच्या धमक्या देणे असे प्रकार होत असल्याचेही आढळून आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर प्रकरणी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी जिल्ह्याचे पोलीस अधिक्षक यांना प्रत्यक्ष भेटून त्याबाबत तक्रारी करुन देखील त्याबाबत कोणतीही कारवाई करण्यात आलेली नाही, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी करुन शहरात शांतता, कायदा व सुव्यवस्था तसेच सलोखा नियंत्रित राहण्याच्यादृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) हे खरे नाही.

(२) हे अशंतः खरे आहे.

भंडारा जिल्ह्यातील तुमसर शहरात पो.स्टे. तुमसर येथे माहे एप्रिल, २०२५ ते दिनांक २५/०६/२०२५ या दरम्यान गांजा विक्री, नशाखोरी/गांजा सेवन करणे, क्रिकेटवर सट्टा लावणे (आयपीएल) अशा गुन्ह्यांची नोंद झालेली आहे.

(३) तुमसर-मोहाडी विधानसभा क्षेत्राचे लोकप्रतिनिधी यांनी पोलीस अधिक्षक कार्यालयाकडे केलेल्या तक्रार अर्जांच्या अनुषंगाने वेळीच दखल घेऊन कायद्याच्या चौकटीत राहून पारदर्शक व निष्पक्ष पध्दतीने कारवाई केली असून लोकप्रतिनिधीच्या सहकार्याने कायदा व सुव्यवस्था अबाधीत राखण्यासाठी सतत प्रयत्न करण्यात येत आहेत.

(४) पोलीस स्टेशन तुमसर व मोहाडी हद्दीतील गुंड प्रवृत्तीच्या इसमांविरुध्द माहे जानेवारी, २०२५ ते मे, २०२५ या कालावधीत महाराष्ट्र पोलीस कायदा कलम ५६, ५७ अन्वये २२ गुंड प्रवृत्तीच्या इसमाविरुध्द प्रतिबंधक कारवाई करण्यात आली असुन ३ इसमांना हद्दपार (Externment) करण्यात आले आहे. तसेच, MPDA कायद्यान्वये ४ प्रस्ताव दाखल करण्यात आले असून १ प्रस्ताव मंजुर झाल्यानं आरोपीस स्थानबध्द करुन कारागृहात पाठविले आहे.

भा.ना.सु.सं. कलम १२६ अन्वये २८३, कलम २२८ अन्वये १, कलम १२९ अन्वये ३२ अशा एकूण ३४२ प्रतिबंधक कार्यवाही करण्यात आल्या आहेत.

पोलीस स्टेशन तुमसर, गोबरवाही, करडी, तसेच इतर पोलीस स्टेशन हद्दीत "ठाणा अधिवेशन" या नावाने जिल्ह्यातील सर्व पोलीस अधिका-याची क्राईम मिटिंग विविध पोलीस ठाण्यांच्या हद्दीत नियमितपणे आयोजित केल्या जातात. अशा क्राईम मिटींगनंतर नागरिकांची सामूहिक बैठक घेऊन त्यांच्या समस्या, तक्रारी समजून घेतल्या जातात व त्यावर जागेवर निर्णय घेण्याचा प्रयत्न केला जातो.

ठाणा अधिवेशन उपक्रमामुळे पोलीस यंत्रणा सतर्क, सक्रीय व जनतेशी सुसंवाद ठेवणारी असल्याचा संदेश समाजात जात आहे तसेच गुन्हेगारी प्रवृत्तीला आळा बसुन कायदा व सुव्यवस्था अबाधित असल्याचा नागरीकांमध्ये विश्वास निर्माण होत आहे.

तुमसर शहरात गुंड प्रवृत्तीवर नियंत्रण ठेवण्यासाठी मौजा खापा येथे नवीन पोलीस चौकी सुरु करण्यात आली आहे. तसेच, तुमसर शहरात वाहतूक नियंत्रणासाठी स्वतंत्र वाहतूक शाखा कार्यान्वित करण्यात आलेली आहे.

पो.स्टे. तुमसर व मोहाडी हद्यीत कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी परिसरात पेट्रोलिंग, नाकेबंदी व कोम्बींग ऑपरेशन नियमीतपणे राबविण्यात येत आहे. तसेच CCTV प्रणाली, बीट मार्शल व गस्त यंत्रणा सक्रीय आहेत.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## स्वारगेट (जि.पुणे) आगारातील नादुरुस्त गाड्या हटवून एसटी आगार व बसस्थानकामध्ये सुरक्षा उपाययोजना करण्याबाबत

**(२८) * ९५७६ श्री.योगेश सागर (चारकोप), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.साजिद पठाण (अकोला पश्चिम), श्री.संजय मेश्राम (उमरेड), श्री.विश्वजित कदम (पलूस कडेगाव), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.बापूसाहेब पठारे (वडगाव शेरी), श्रीमती मोनिका राजळे (शेवगांव) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे येथील स्वारगेट एस.टी.आगारात भंगार अवस्थेतील शिवशाही बसमध्ये तरुणीवर अत्याचार झाल्याच्या घटनेनंतर सरकारने राज्य परिवहन (एस.टी.) महामंडळाच्या आगारात वर्षानुवर्षे पडून असलेल्या भंगार गाड्या हटविण्यासाठी प्रादेशिक परिवहन कार्यालयाला कळविले असतानाही कित्येक वर्षापासूनच्या भंगार गाड्या अजूनही एस.टी.आगारात उभ्या असून त्या हटविण्याबाबत एस.टी.महामंडळाने अद्याप कोणताही निर्णय घेतला नसल्याचे दिनांक २५ एप्रिल, २०२५ रोजी निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर बस स्थानकामध्ये घडलेल्या घटनेमुळे मा.परिवहन मंत्री महोदयांनी राज्यातील सर्वच बस स्थानक आणि आगारांचे तातडीने सुरक्षा ऑडिट करण्याचे आदेश दिले होते, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, प्रवाशांच्या सुरक्षिततेबाबत हलगर्जीपणा करणाऱ्या आगार प्रमुखाची विभागनिहाय चौकशी करुन दोषींवर तात्काळ निलंबित करण्याची कारवाई करून याबाबतचा अहवाल सादर करण्याचे आदेश देऊन दीड महिना झाला तरी अद्याप कोणताही अहवाल शासनाकडे सादर केला नसल्याची बाब माहे मे, २०२५ मध्ये निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, राज्यात महिला आजही असुरक्षित असून कामाच्या ठिकाणी, कार्यालये, एस.टी. प्रवास दरम्यान महिलांची छेड काढणे, अश्लील वर्तन, गलिच्छ शब्दप्रयोग, मुद्दाम स्पर्श करणे व गैरवर्तणुक करणे अशा घटनांमध्ये वाढ झाली असून सुरक्षिततेच्या दृष्टीने आयपीएस दर्जाच्या अधिकाऱ्याची एसटी महामंडळात नियुक्ती करण्यात यावी अशी स्थानिक लोकप्रतिनिधींनी मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने सखोल चौकशी करुन भंगार गाड्या हटविण्याबाबत व एसटी आगारासह बसस्थानकामध्ये सुरक्षेसाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रताप सरनाईक :** (१) रा. प. महामंडळ परिसरामध्ये असलेल्या भंगार वाहनाबाबत लिलाव प्रक्रियेसंबंधी परिवहन कार्यालयाशी पाठपुरावा करण्यात येत असून प्रादेशिक परिवहन कार्यालयाकडून सदर भंगार वाहनाच्या लिलावाची प्रक्रिया चालू आहे.
(२) होय.
(३) स्वारगेट आगाराचे आगार प्रमुख (वरिष्ठ) व कनिष्ठ तसेच सहायक वाहतूक अधिक्षक आणि सहायक वाहतूक निरीक्षक यांना निलंबीत करण्यात आले असून त्यांना आरोपपत्र देण्यात आले आहे.
(४) लोकप्रतिनिधींनी मागणी केलेली आहे.
(५) प्रादेशिक परिवहन कार्यालयाकडून जप्त केलेली खाजगी मालकीची वाहने, जी रा.प.महामंडळाच्या आगार, स्थानक अथवा विभागीय कार्यशाळांमध्ये उभी करण्यात येणाऱ्या, त्या गाड्यांचा लिलाव करून विक्रीची कार्यवाही करण्यात आली आहे व इतर भंगार गाड्यांची लिलाव प्रक्रीया सुरू आहे.

सुरक्षा व दक्षता शाखेमार्फत सुरक्षा रक्षकांची नेमणूक करण्यात आलेली असून, नियमित सुरक्षा व्यवस्था तपासली जाते. तसेच सी.सी.टी.व्ही. जोडण्यात आलेले असून, महिला सुरक्षा रक्षकांची नेमणूक केलेली आहे.

-----------------

## पुणे शहरातील कल्याणी नगर येथे खाजगी बंगल्यांमध्ये अवैधरित्या पब व बार सुरु असल्याबाबत

**(२९)** * **८००२ श्री.बापूसाहेब पठारे (वडगाव शेरी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे शहरातील कल्याणी नगर येथे खाजगी बंगल्यांमध्ये अवैधरित्या पब व बार सुरु असल्याचे नुकतेच निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कल्याणी नगर येथील पब व बारमध्ये येणाऱ्या ग्राहकांची वाहने रस्त्याच्या दुतर्फा लावल्यामुळे सदर भागात मोठ्या प्रमाणावर वाहतूक कोंडी होत असून अपघाताच्या प्रमाणात वाढ झाल्याचे माहे मे, २०२५ मध्ये निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, वाढत्या अपघातांच्या घटनांमुळे सदर भागातील नागरिक व सामाजिक संस्थांनी वाहतूक पोलीस, बांधकाम विभाग, पोलीस प्रशासन यांचेकडे तक्रारी करुनही यासंदर्भात कोणतीही कार्यवाही करण्यात आलेली नाही, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन सदर भागातील वाहतूक व्यवस्था सुरळीत करणेबाबत तसेच दोषी पब व बार मालक आणि याकडे दुर्लक्ष करणाऱ्या संबंधित अधिकाऱ्यांविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) कल्याणीनगर भागातील खाजगी बंगल्यांमध्ये हॉटेल एलिफंटा बार, परगोला हॉटेल, कुक हॉटेल, हायलॅण्ड हॉटेल या आस्थापनांमध्ये महानगर पालिकेकडुन फुड लायसन्स, राज्य उत्पादन शुल्क विभागाकडुन एफ एल-३ अनुज्ञप्ती घेऊन हॉटेल व बार (परमिट रूम) सुरू करण्यात आले आहेत.
(२) हे खरे नाही.
(३) हे खरे नाही.

सदर बाबत वाहतूक विभाग, पुणे शहर कडे सन २०२४ मध्ये २ व सन २०२५ मध्ये ४ तक्रार अर्ज प्राप्त झाले होते. त्याअनुषंगाने योग्य ती कायदेशीर कारवाई करण्यात आलेली आहे.

कल्याणी नगर परिसरामध्ये १ जानेवारी, २०२५ ते मे, २०२५ या कालावधीमध्ये नो-पार्किंग झोन मध्ये पार्क केलेल्या ४१८ वाहनांवर दंडात्मक कारवाई करून एकूण रु.२,४९,००० इतका दंड आकारण्यात आला आहे. तसेच, मोटार वाहन कायद्यानुसार वेगवेगळ्या शीर्षाखाली (दुचाकी, चारचाकी, जड अवजड वाहने, रॉंग साईड, मोबाईल टॉकिंग, ट्रिपलसीट, नो एन्ट्री इ.) एकूण ३३८६ वाहनांवर रु. २६,३९,४०० इतक्या रकमेची दंडात्मक कारवाई करण्यात आली आहे.
(४) सदर भागातील वाहतूक व्यवस्था सुरळीत करण्याकरिता पुणे वाहतूक विभागाकडून सेलेब्रियम आयटी पार्क बिल्डींग नं. ३ ते मेरिगोल्ड सोसायटी रोडपर्यंत ४०० मीटर रोडवर नो-पार्किंग झोन करण्यात आले आहे.

तसेच, सन २०२५ मध्ये कल्याणीनगर मधील हॉटेल व बार मालक/व्यवस्थापक यांना पार्किंग संदर्भात नोटीस देण्यात आलेल्या आहेत.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यात सुरक्षेचे नियम डावलून परमिटशिवाय शालेय बसेस विद्यार्थ्यांची ने-आण करत असल्याबाबत

**(३०) * ७३५१ श्री.काशिनाथ महादु दाते (पारनेर), श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी), श्री.मनोज जामसुतकर (भायखळा), श्री.रोहित पवार (कर्जत जामखेड), डॉ.बाबासाहेब देशमुख (सांगोले), श्री.धर्मरावबाबा आत्राम (अहेरी), श्री.दौलत दरोडा (शहापूर), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), डॉ.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्री.अनिल पाटील (अमळनेर), श्री.नारायण कुचे (बदनापूर) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील विद्यार्थ्यांना शाळा महाविद्यालयात येण्या-जाण्यासाठी जवळपास १ लाखापेक्षा जास्त बसेस असून त्यापैकी ४० हजार स्कुल बसेस अधिकृत तर ६० हजार बसेस अनधिकृतपणे धोकादायक पध्दतीने विद्यार्थ्यांची

ने-आण करीत असल्याच्या अनेक तक्रारी शाळा बसचालक, मालक संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी मा.परिवहन मंत्री महोदयांकडे दिनांक ९ मे, २०२५ रोजी केली असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मुलांच्या सुरक्षेचे नियम डावलून परमिटशिवाय धावणाऱ्या बेकायदा व्हॅन्स, खासगी गाड्यांवर कारवाई करण्याची व स्कूल बसेसच्या नियमावलीत आवश्यक सुधारणा करण्याची मागणी शाळा बसचालक, मालक संघटनेने केली असून त्यानुसार सर्व अनधिकृत स्कुल बसवर कारवाई करण्याचे आदेश मा.परिवहन मंत्री महोदयांनी दिले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, वाहनांचे फिटनेस, आसन क्षमता आणि विद्यार्थ्यांची संख्या, चालक आणि अटेंडंट्स यांचे चारित्र्य प्रमाणपत्र, दूरध्वनी क्रमांक शाळा व महाविद्यालय प्रशासनाकडे संग्रहित करणे, वाहन चालवण्याचे अनुभव प्रमाणपत्र, स्कूल बसेसमधील सीसीटीव्ही कॅमेरे, प्रथमोपचार पेटी बंधनकारक करणे इत्यादी बाबींची पूर्तता करणे स्कूल बसेसवर बंधनकारक करणे आवश्यक आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने सखोल चौकशी करुन शालेय मुलांची सुरक्षा धोक्यात टाकून नियमबाह्य वाहतुक करणाऱ्या खासगी बस व इतर वाहनांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रताप सरनाईक :** (१) स्कूल बस असोसिएशन, पालक असोसिएशन व मा.मंत्री (परिवहन) यांचे समवेत दिनांक ०८.०५.२०२५ रोजी झालेल्या चर्चेमध्ये याबाबतची तक्रार स्कूल बस असोसिएशन यांनी मा.मंत्री (परिवहन) यांचेकडे केली आहे.

(२) होय.

(३) व (४) वाहनाचे नोंदणी प्रमाणपत्र, योग्यता प्रमाणपत्र, विमा प्रमाणपत्र, परवाना, वायू प्रदूषण नियंत्रण प्रमाणपत्र, वाहन चालविण्याचे लायसन्स, अग्निशामक, प्रथमोपचार पेटी इ. बाबींची पूर्तता करणे बंधनकारक आहे.

अनधिकृतपणे, धोकादायक पध्दतीने विद्यार्थ्यांची ने-आण करणाऱ्या वाहनांची नियमितपणे तपासणी करण्याबाबत परिवहन आयुक्त कार्यालयाने वेळोवेळी सर्व प्रादेशिक परिवहन कार्यालय व उप प्रादेशिक परिवहन कार्यालयांना सूचना दिलेल्या आहेत.

एप्रिल, २०२४ ते मार्च, २०२५ या कालावधीत सर्व प्रादेशिक परिवहन कार्यालय व उप प्रादेशिक परिवहन कार्यालयाच्या वायुवेग पथकाद्वारे ७२०६ इतक्या दोषी वाहनांवर कारवाई करण्यात आली असून रु.४९२.९९ लक्ष इतका दंड वसूल करण्यात आला आहे.

स्कूल बस नियमावलीमध्ये सुधारणा करण्याच्या अनुषंगाने शासनाने एक सदस्यीय समिती नेमली आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## दक्षिण सोलापूर (जि.सोलापूर) तालुक्यातील भीमा नदीकाठच्या गावांतील कृषी पंपांचा वीज पुरवठा बंद न करता पाणी सोडण्याबाबत

**(३१) * ९७५७ श्री.सुभाष देशमुख (सोलापूर दक्षिण) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) दक्षिण सोलापूर (जि.सोलापूर) तालुक्यातील भीमा नदीकाठच्या टाकळी, औंज, चिंचपूर, कुरघोट या गावांतील कृषी पंपाचा वीज पुरवठा खंडित करण्याचे आदेश जिल्हाधिकाऱ्यांनी महावितरणाला दिले असल्याची बाब माहे एप्रिल, २०२५ मध्ये निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त गावात केवळ तीन तास वीज पुरवठा करण्यात येत असल्याने शेत पिके पाण्याअभावी सुकून जात आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे व त्यानुषंगाने सोलापूर शहराला पाणीपुरवठा करत असताना या गावातील कृषी पंपांचा वीज पुरवठा बंद न करता शहराला आणि या चारही गावांना शेतीसाठी पुरेल इतके पाणी सोडण्यासाठी कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय, हे खरे आहे.
(२) हे खरे नाही.
उप अभियंता व जनसंपर्क अधिकारी, लाभक्षेत्र विकास प्राधिकरण, सोलापूर यांच्याकडे शेत पीके पाण्याअभावी जळत असल्याबाबत कोणताही तक्रार अर्ज प्राप्त झालेला नाही.
(३) जिल्हाधिकारी, सोलापूर यांचेकडून कृषी पंपाचा विद्युत पुरवठा नियंत्रित करण्याचे आदेश प्राप्त झाल्यानंतर, टाकळी, औज, चिंचपूर, कुरघोट या गावातील फक्त नदी काठाच्या कृषीपंपाचा वीजपुरवठा ठराविक कालावधीकरीता खंडित करण्यात येतो. तसेच नदी काठ सोडून इतर ठिकाणी असलेल्या कृषीपंपाना महावितरण कंपनीच्या प्रचलित नियमानुसार ८ तास विजपुरवठा करण्यात येतो.
सोलापूर शहरासाठी उजनी जलाशय उदभव असलेली दुसरी समांतर पाणी पुरवठा योजना सोलापूर महानगरपालिकेमार्फत कार्यान्वित करण्यात येत आहे. सदर योजना कार्यान्वित झाल्यानंतर भीमा नदीकाठच्या गावातील कृषीपंपाचा वीज पुरवठा खंडीत न करता सदर गावांसाठी सिंचनाचे नियोजन करण्यात येणार आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## जालना जिल्ह्यामध्ये इन्फ्राच्या अधिकाऱ्यांनी केलेल्या निकृष्ट दर्जाच्या कामांची उच्चस्तरीय चौकशी करण्याबाबत

**(३२)** * **१३३८८ श्री.बबनराव दत्तात्रय यादव (लोणीकर) (परतूर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) जालना जिल्ह्यामध्ये केंद्र व राज्य शासनाच्या माध्यमातून मोठ्या प्रमाणात वितरण व्यवस्थेमध्ये सुधारणा केली जात असून त्या माध्यमातून स्वातंत्र्यापासून आजपर्यंतच्या कालावधीमध्ये जीर्ण झालेले विजेचे खांब, विजेच्या तारा यासह गावाला मुबलक वीज मिळावी यासाठी गाव फिडर योजनेच्या माध्यमातून वीज व्यवस्थेमध्ये मोठा बदल केला जात आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर प्रकरणी विश्वनाथ नामक एजन्सीला उक्त काम देण्यात आले असता, सदरील एजन्सीने काम दुसऱ्या एजन्सीला दिले. त्या एजन्सीने देखील ते काम पुन्हा तिसऱ्या एजन्सीला दिले मात्र असे करतांना प्रत्येकाने आपआपला वाटा काढून घेतल्याने करण्यात आलेले काम अत्यंत निकृष्ट दर्जाचे झाले असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त काम करतांना एजन्सीने विजेचे खांब उभे करताना ६ फुटापर्यत सिमेंट कॉंक्रिटीकरण करणे अपेक्षित असताना राज्यात सगळीकडे केवळ एक ते दीड फुटापर्यंत कॉंक्रिटीकरण करणे, डांबरीकरण किंवा सिमेंट कॉंक्रिटीकरण करत असतांना खांब रस्त्याच्या लगत किंवा कडेला फुटभर अंतरावर उभे करणे अशा प्रकारची दर्जाहीन कामे केल्याने शासनाचा खर्च वाया जावून जिवितहानी देखील होण्याची शक्यता निर्माण झाली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने उच्चस्तरीतय चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने या गैरव्यवहाराशी संबंधित इन्फ्राचे मुख्य अभियंता, अधीक्षक अभियंता व कार्यकारी अभियंता तसेच दर्जाहिन काम करणाऱ्या सर्व एजन्सीना काळ्या यादीत टाकण्याबाबत कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय हे खरे आहे.
(२) व (३) हे खरे नाही.

महावितरणकडून जालना जिल्ह्यासाठी सदर कामे मे. विश्वनाथ प्रोजेक्ट लि., हैद्राबाद या एजन्सीला देण्यात आले आहेत. या योजनेअंतर्गत एकूण १४४ वाहिनी विलगीकरणाची कामे प्रस्तावित आहेत. उपरोक्त कामे पूर्ण करण्याचा कालावधी कार्यादेश दिल्यापासून १८ ते २७ महिने इतका आहे. त्यापैकी एकूण ५५ वाहिन्यांच्या विलगीकरणाची कामे पूर्ण झाली असून ३३ वाहिन्यांची कामे प्रगती पथावर आहेत.

महावितरणकडून वेळोवेळी कामांची तपासणी विविध स्तरांवर करून, कॉक्रिटीकरण व पोल चा खड्डा पोलच्या उंचीच्या १/६ पर्यंत केले आहे किंवा नाही हे ऑगर ट्रक्टर च्या सहाय्याने प्रत्येक फिडरचे पोल नमुन्यादाखल तपासले जातात. तांत्रिक कामे करताना, कंत्राटदाराच्या कामामध्ये काही त्रुटी आढळल्यास कंत्राटदाराकडे पाठपुरावा करुन सदर त्रुटींची पूर्तता करण्यात येते. तसेच आर.ई.सी.पी.डी.सी.एल. यांची प्रकल्प व्यवस्थापन एजन्सी (Project Management Agency PMA) म्हणून नेमणूक करण्यात आली असून सदर एजन्सी मार्फत देखील नियमितपणे प्रत्येक फिडरची कंत्राटदाराच्या केलेल्या कामाची पाहणी करण्यात येते. त्रुटीची पुर्तता केल्यानंतर सदर कंत्राटदाराच्या कामाची देयके अदा करण्यात येतात. तसेच वाहिन्या कार्यान्वित करण्याआधी विद्युत निरिक्षक यांच्या कार्यालयाकडून कामाची तपासणी करून काही त्रुटी निदर्शनास आल्यास सदर त्रुटींचे कंत्राटदाराकडून निवारण करून उच्चदाब वाहिनी व वितरण रोहित्रांची कामे विद्युत निरिक्षक यांच्या कार्यालयाकडून परवानगी प्राप्त झाल्यानंतरच कार्यान्वित केली जातात.
(४) सदर एजन्सिच्या कामाची गुणवत्ता तपासण्यासाठी दि.१६.०५.२०२५ अन्वये अधीक्षक अभियंता पायाभूत आराखडा यांच्या अध्यक्षतेखाली अतिरिक्त कार्यकारी अभियंता पायाभूत आराखडा, उपकार्यकारी अभियंता छत्रपती संभाजीनगर परिमंडळ, तसेच केंद्रशासन पुरस्कृत मे. आर.ई.सी.पी.डी.सी.एल. प्रतीनिधी यांचा समावेश असलेल्या चौकशी समितिमार्फत झालेल्या कामांचा दर्जा व गुणवत्ता यांची तपासणी करण्यात आली. सदरील कामे महावितरण कंपनीच्या नियमाप्रमाणे पूर्ण केलेली आढळली आहेत.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## ऑनलाईन प्रवासी सेवा देणाऱ्या ओला उबेर आणि रॅपिडोसारख्या कंपन्यांच्या कारभारावर नियंत्रण ठेवण्याकरिता समितीची नियुक्ती करण्याबाबत

**(३३)** * **१२०४६ श्री.शंकर जगताप (चिंचवड) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पुणे जिल्ह्यातील पिंपरी चिंचवड आणि पुणे प्रादेशिक परिवहन विभागाच्या अंतर्गत ७५००० कॅब आणि दीड लाख ओला, उबेर आणि रॅपिडो सारख्या ऑनलाइन प्रवासी सेवा देणाऱ्या कंपन्यांमध्ये रिक्षांची नोंद आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, ओला, उबेर आणि रॅपिडो सारख्या ऑनलाईन प्रवासी सेवा देणाऱ्या कंपन्यांचे रिक्षा चालक बुकिंग केल्यानंतर प्रवाशांकडून किलोमीटर प्रमाणे अधिक पैशाची मागणी करतात, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, ऑनलाईन बुकिंग करणाऱ्या प्रवाशांनी नकार दिल्यास बुकिंग रद्द करून रिक्षा किंवा कॅब मधून महिला व ज्येष्ठ नागरिक प्रवाशांना उतरण्यास भाग पाडतात, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, ऑनलाईन प्रवासी सेवा देणाऱ्या कंपनीकडून जादाचे भाडे आकारताना होत असलेल्या लुटीबाबत प्रवाशांकडून मोठ्या प्रमाणावर प्रादेशिक परिवहन कार्यालयाकडे तक्रारी केल्या जात असून प्रवाशांची अडवणूक करणाऱ्या ऑनलाईन रिक्षा व कॅब चालकांच्या मनमानी कारभाराला व आर्थिक लुटीला प्रतिबंध घालण्याबाबत प्रादेशिक परिवहन कार्यालयाकडून कोणती कार्यवाही करण्यात येत आहे,
(५) तसेच मोटर वाहन कायद्यानुसार प्रवाशांची आर्थिक लूट करणाऱ्या ऑनलाइन प्रवासी सेवा देणाऱ्या कंपनीचा परवाना रद्द करून दंड करण्याबाबत व कंपन्यांच्या कारभारावर नियंत्रण ठेवण्याकरिता समितीची नियुक्ती करण्याकरिता शासन स्तरावर कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रताप सरनाईक :** (१) हे खरे आहे.
(२) याबाबतचे वृत्त एका दैनिक वृत्तपत्रामध्ये प्रसिध्द झाले आहे.
(३) व (४) ऑनलाईन प्रवासी सेवा देणाऱ्या कंपनीकडून बुकींग केल्यानंतर भाडे नाकारण्याबाबत तक्रार प्राप्त झाल्यास प्रादेशिक परिवहन कार्यालय, पुणे व पिंपरी-चिंचवड कार्यालयाच्या वायुवेग पथकाद्वारे नियमित कारवाई केली जाते. तसेच ऑटोरिक्षा व टॅक्सीची नियमित तपासणी करण्यात येत असून दिनांक ०१.०४.२०२४ ते दिनांक ३१.०३.२०२५ या कालावधीत एकूण ११५९ ऑटोरिक्षांवर कारवाई करण्यात येऊन रु.२.५८ लक्ष इतका दंड वसुल करण्यात आला आहे.
(५) केंद्रीय मोटार वाहन एग्रीगेटर मार्गदर्शक तत्वे २०२० अनुषंगाने राज्यात ॲप बेस वाहनांसाठी Maharashtra Regulation of The Aggregators Rules, २०२२ तयार करण्यासाठी शासनाने दिनांक ०५.०४.२०२३ रोजीच्या शासन निर्णयान्वये श्री. सुधीरकुमार श्रीवास्तव (सेवानिवृत्त भा.प्र.से.) यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठीत केली आहे. सदर समितीने दिनांक ०४.०१.२०२४ रोजी अहवाल सादर केला आहे. सदर समितीचा अहवाल, अधिनियम व नियमातील तरतूदींच्या अनुषंगाने मोटार वाहन अधिनियम, १९८८ च्या कलम ९३ मधील तरतुदीनुसार ॲप बेस वाहनांसाठी समुच्चयक (Aggregator) धोरण लागू करण्याबाबतच्या प्रस्तावास दिनांक २९.०४.२०२५ रोजीच्या मा. मंत्रिमंडळ बैठकीमध्ये मान्यता प्राप्त झाली आहे. त्यानूसार राज्यात ॲप बेस वाहनांसाठी समुच्चयक (Aggregator) धोरण लागू करण्याबाबत दिनांक २०.०५.२०२५ रोजी शासन निर्णय निर्गमित करण्यात आला असून याबाबतची नियमावली स्वतंत्रपणे प्रकाशित करण्यात येणार असल्याचे सदर शासन निर्णयामध्ये नमूद करण्यात आले आहे. त्यानुसार नियमावलीचा मसुदा बनविण्याची बाब कार्यवाहीखाली आहे.
(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## यवतमाळ जिल्ह्यातील इतर मागास बहुजन कल्याण विभागातील आश्रमशाळेच्या पदभरतीमध्ये झालेला गैरव्यवहार

**(३४) * १३०३२ श्री.अनिल मांगुळकर (यवतमाळ) :** सन्माननीय **इतर मागास बहुजन कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) यवतमाळ जिल्हयातील इतर मागास बहुजन कल्याण विभागाच्या निर्मितीनंतर प्रादेशिक कार्यालय अमरावती येथे प्रभारी अतिरिक्त अधिकाऱ्यांच्या माध्यमातून विभागाचा कार्यभार चालविला जात आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रभारी अतिरिक्त अधिकाऱ्यांनी यवतमाळ येथील आश्रमशाळांमध्ये नियमबाहय पदभरती करताना आर्थिक गैरव्यवहार केला असल्याचे माहे जून, २०२५ मध्ये निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुसार उक्त गैरव्यवहार करणाऱ्या अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अतुल सावे :** (१) नाही.

इतर मागास बहुजन कल्याण विभागाच्या निर्मितीनंतर शासन निर्णय, दि.२१.११.२०२२ अन्वये सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाच्या मूळ आस्थापनेवरील उपायुक्त समाज कल्याण (गट-अ) संवर्गातील अधिकाऱ्यास प्रादेशिक उपसंचालक, इतर मागास बहुजन कल्याण (प्रादेशिक) विभाग, अमरावती या पदावर प्रतिनियुक्तीने कार्यभार देण्यात आलेला आहे.
(२) प्रतिनियुक्तीने कार्यरत असलेल्या प्रादेशिक उपसंचालक, इतर मागास बहुजन कल्याण (प्रादेशिक) विभाग, अमरावती यांनी आश्रमशाळेतील पदभरती प्रक्रियेत आर्थिक गैरव्यवहार केल्याची बाब माहे जून, २०२५ मध्ये निदर्शनास आलेले नाही.
(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही

-----------------

## लाखनी (जि.भंडारा) येथील भूमाफियांनी शासनाचे बनावट शिक्के व बनावट स्वाक्षरी करुन शासनाची व नागरिकांची केलेली फसवणूक

**(३५)** * **१४२०९ श्री.नानाभाऊ पटोले (साकोली) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भंडारा जिल्हयातील लाखनी येथील काही भूमाफियांनी शासनाचे बनावट शिक्के व संबंधित अधिकारी यांची बनावट स्वाक्षरी करुन शासनाची व नागरिकांची दिशाभूल करुन फसवणूक केली असल्याने पोलीस स्टेशन लाखनी येथे अपराध क्र.०५/२०२३ अन्वये तक्रार दाखल करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, त्याअनुषंगाने अप्पर महासंचालक, लाचलुचपक प्रतिबंध विभाग, महाराष्ट्र यांनी अपराध क्र.०५/२०२३ च्या कलमासोबत भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम १९८८ चे कलम १३(१)(९), १३(२) ची वाढ करणेबाबत मा.पोलीस अधिक्षक, भंडारा यांना आदेश होण्याकरिता मा.महासंचालक, मुंबई यांना दिनांक ८ फेब्रुवारी, २०२४ रोजी पत्र देण्यात आले असतांना देखील सदरहू पत्रावर कोणतीही कार्यवाही करण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने संबंधितांविरुद्ध कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) हे खरे आहे.

शासनाचे/शासकीय बनावटीचे खोटे शिक्के तयार करून तलाठी, महसूल विभाग व नगर रचना कार्यालयाच्या शासकीय कर्मचारी यांना हाताशी धरून आरोपींनी शेतकऱ्यांच्या जागा स्वतःच्या फायद्याकरिता अकृषक करून घेतल्याने व शासनाला अकृषक पासून प्राप्त होणाऱ्या रु.१,९०,७२,०००/- ची फसवणुक केल्याच्या प्राप्त तक्रारीवरून पो. ठाणे, लाखनी येथे दिनांक १२.०१.२०२३ रोजी भा.दं.वि. चे कलम ४०९, ४१८, ४२०, ४६५, ४६७, ४६८, ४७१, ४७३, १२०, (ब), ३४ अन्वये अप.क्र. ०५/२०२३ नोंद करण्यात आला आहे.

(२) हे खरे नाही.

तक्रारदार यांचा दिनांक ०१.०४.२०२२ रोजीचा पोलीस अधिक्षक, लाचलुचपत प्रतिबंध कार्यालय, नागपुर यांना अग्रेषित केलेला अर्ज अप्पर महासंचालक, लाचलुचपक प्रतिबंध विभाग, महाराष्ट्र राज्य यांच्या दिनांक ०८.०२.२०२४ च्या पत्रान्वये पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य यांना प्राप्त झाला होता. सदर अर्ज पुढील कार्यवाही करिता पोलीस महासंचालक कार्यालयाच्या दिनांक १८.०२.२०२५ रोजीच्या पत्रान्वये पोलीस अधीक्षक, भंडारा यांना पाठविण्यात आला असून सदर अर्ज तपासात सामील करण्यात आला आहे. तथापि, सदर गुन्ह्यातील आरोपी असलेल्या शासकीय कर्मचाऱ्यांविरोधात अद्यापपर्यंत पुरावा आढळून न आल्याने अप.क्र. ०५/२०२३ मध्ये भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम १९८८ चे कलम १३(१) (अ), १३(२) समाविष्ट करण्यात आलेले नाही. सदर गुन्ह्याचा तपास सुरु आहे.

(३) सदर गुन्ह्याच्या तपासामध्ये एकूण १२ आरोपी निष्पन्न झालेले असून त्यामध्ये नगर रचना कार्यालय, भंडारा येथील दोन लिपीक व एक नगर रचनाकार यांचा समावेश आहे. सदर गुन्ह्यातील आरोपींना अटक पूर्व जामीन / अंतरीम जामीन मंजूर करण्यात आलेला आहे.

प्रस्तुत गुन्ह्याच्या अनुषंगाने मा.उच्च न्यायालय, नागपूर येथे याचिका दाखल असून पुढील आदेशापर्यंत दोषारोपपत्र दाखल न करण्याचे मा. न्यायालयाचे आदेश असल्याने दोषारोपपत्र दाखल नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## पुरंदर (जि.पुणे) येथील आंतरराष्ट्रीय विमानतळ प्रकल्पबाधित शेतकऱ्यांवर पोलिसांनी केलेला लाठीहल्ला

**(३६) * १३११२ श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.हेमंत ओगले (श्रीरामपूर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुरंदर (जि.पुणे) येथील आंतरराष्ट्रीय विमानतळ प्रकल्पबाधित एखतपूर गावातील शेतकऱ्यांनी ड्रोन सर्व्हेसाठी आलेल्या अधिकाऱ्यांना काम करण्यास विरोध केल्यामुळे पोलिसांनी शेतकऱ्यांवर लाठीहल्ला केल्याची घटना माहे मे, २०२५ मध्ये घडली आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर लाठीहल्ल्यात अनेक शेतकरी जखमी झाले असून या आंदोलना दरम्यान आतापर्यंत तीन शेतकऱ्यांचा मृत्यू झाला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शेतकऱ्यांचा विरोध असतानाही तो हा प्रकल्प राबविण्यात येत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी करुन, चौकशीच्या अनुषंगाने शासनाच्या धोरणानुसार प्रकल्पबांधितांना न्याय मिळणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) हे अंशत: खरे आहे.

एखतपूर, ता.पुरंदर, जि.पुणे येथील शेतकऱ्यांनी ड्रोन सर्व्हेसाठी आलेल्या महसूल व पोलीस विभागाच्या अधिकारी/कर्मचारी यांचेवर दगडफेक करून हल्ला केला. त्यावेळी बंदोबस्ताकरिता उपस्थित पोलीस अधिकारी, कर्मचारी यांनी परिस्थिती नियंत्रणात आणण्यासाठी कमीतकमी व योग्य त्या बळाचा वापर केला होता.

(२) शेतकऱ्यांनी ड्रोन सर्व्हेसाठी आलेल्या अधिकाऱ्यांना काम करण्यास केलेल्या विरोधावेळी पोलीसांनी वापर केलेल्या वाजवी बळामुळे कोणत्याही शेतकऱ्याचा मृत्यू झालेला नाही. तथापि, काही महसूल व पोलीस विभागाचे अधिकारी/कर्मचारी व काही ग्रामस्थ जखमी झाले होते.

(३) पुणे येथे वाढलेली लोकसंख्या व विमानसेवा वापर पाहता पुणे येथे दुसऱ्या विमानतळाची आवश्यकता होती. त्यानुषंगाने योग्य जागेबाबत तपासणी केली असता मुंजेवाडी-पारगाव मेमाणे ता.पुरंदर, जि.पुणे या गावामधील एक ठिकाण विमानतळ विकासासाठी योग्य असल्याबाबत भारतीय विमानपत्तन प्राधिकरण यांचेकडून अहवाल प्राप्त झाले. पुरंदर (जि.पुणे) आंतरराष्ट्रीय विमानतळाच्या जागेस केंद्र शासनाच्या संरक्षण मंत्रालयाने जानेवारी, २०१८ मध्ये "ना- हरकत" प्रमाणपत्र दिले आहे. तसेच विमानतळाच्या "Site Clearance" च्या प्रस्तावास ग्रीनफिल्ड विमानतळांकरिता केंद्र शासनाने नियुक्त केलेल्या सुकाणू समितीच्या दि.२३/०४/२०१८ रोजी झालेल्या बैठकीत मान्यता देण्यात आली आहे. त्यामुळे सदर विमानतळ प्रकल्प पूर्ण करणे आवश्यक आहे.

(४) दि.०९/०५/२०१८ रोजीच्या शासन निर्णयान्वये पुरंदर, जि.पुणे येथील प्रस्तावित छत्रपती संभाजीराजे आंतरराष्ट्रीय विमानतळ उभारण्यास व भूसंपादनास प्रशासकीय व वित्तीय मान्यता देण्यात आली आहे. सदर नियोजित विमानतळासाठी आवश्यक असणाऱ्या जमिनीचे संपादन, नुकसान भरपाई व पुनर्वसन या सर्व बाबींची पुर्तता नियमानुसार करण्यात येईल.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## पळस (ता.रोहे, जि.रायगड) येथे महापारेषणच्या अधिकाऱ्यांनी शेतकऱ्यांना नोटीस न देता उच्चदाब टॉवर विद्युत लाईनचे काम सुरु केल्याबाबत

**(३७)** * **१४००७ श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पळस (ता.रोहे, जि.रायगड) येथे ग्रामपंचायत हद्दीत शेतकऱ्यांना कोणतीही नोटीस न देता व विश्वासात न घेता नियमांचे उल्लंघन करुन गत दोन वर्षापासून उच्चदाब टॉवर विद्युत लाईनचे काम सुरु असल्याने शेतकऱ्यांच्या शेतपिकांचे नुकसान होत असल्याचे नुकतेच निदर्शनास आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर काम जेएसडब्ल्यु कंपनी व महापारेषणचे अधिकारी यांनी संगनमताने केले असल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी काम सुरु केल्याच्या निषेधार्थ येथील बाधित शेतकऱ्यांनी महापारेषणचे कार्यकारी अभियंता यांना दिनांक २६ मार्च, २०२५ रोजी लेखी निवेदन देऊनही अद्याप कोणतीही कार्यवाही करण्यात आलेली नाही, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर प्रकरणी चौकशी करुन शेतकऱ्यांच्या पिकांचे नुकसान टाळणे व शेतकऱ्यांना नुकसान भरपाई देण्यासह दोषी कंपनी व यास जबाबदार संबंधित अधिकारी यांचेविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) हे खरे नाही.

सदर वाहिनी २२० के.व्ही. नागोठणे वडखळ वाहिनी असून या वाहिनीचे काम समर्पित वितरण व्यवस्था (Dedicated Distribution Facility) अंतर्गत मे. जे.एस.डब्लु यांचेतर्फे महापारेषण कंपनीच्या देखरेखीखाली करण्यात येत आहे.

वाहिनीच्या कामाची अधिसूचना दि. ०३.१०.२०२४ रोजी प्रसिध्द करण्यात आली आहे. पुण्यनगरी, रत्नागिरी टाईम्स व कृषीवल या स्थानिक वृत्तपत्रांमध्येही प्रकाशित करण्यात आली होती. त्याचप्रमाणे पळस गावातील बाधित शेतकऱ्यांना वैयक्तिक सूचनाही देण्यात आलेली होती.

(२) हे खरे नाही.

सदर काम मे.जे.एस.डब्लु स्टील लि., डोलवी, ता.पेण, जि.रायगड यांचे टप्पा III अंतर्गत करण्यात येत असलेल्या १० ते १५ दशलक्ष टन प्रति वर्ष क्षमता विस्तारास विद्युत पुरवठा करण्यासाठी मे.जे.एस.डब्लु स्टील लि. मार्फत महापारेषण कंपनीच्या देखरेखीत प्रचलित नियमांच्या अधिन राहून करण्यात येत आहे.

(३) हे खरे नाही.

पळस ग्रामपंचायत, रोहे येथील शेतकऱ्यांनी दि.२४.०३.२०२५ रोजी अतिरिक्त कार्यकारी अभियंता, पनवेल यांना सदरील काम थांबविण्याबाबत पत्र दिले होते. त्या अनुषंगाने उप विभागीय अधिकारी, रोहा यांच्या दालनात दि.०२.०५.२०२५ रोजी वाहिनी बाधित शेतकरी, मे.जे.एस.डब्लु, महापारेषण व संबंधित कंत्राटदार यांचे प्रतिनिधी, तहसिलदार रोहा, सहा.पोलीस निरिक्षक, रोहा इ. यांच्या समवेत बैठक घेण्यात आली आहे. सदर बैठकीत शेतकऱ्यांचे किती क्षेत्र बाधित होणार आहे, नुकसान भरपाई किती असेल याचा उल्लेख करुन बाधित शेतकऱ्यांना सूचना देण्याबाबत व तोपर्यंत काम बंद करण्याबाबत निर्णय झालेला आहे.

(४) सदर प्रकरणी वाहिनी उभारणी संबंधीच्या प्रचलित सर्व आवश्यक कार्यपद्धतींचे व नियमांचे पालन करण्यात आलेले आहे. त्यामुळे कारवाईची आवश्यकता नाही.

(५) कार्यवाही सुरु असल्याने लागू नाही.

-----------------

## मालाड (मुंबई) येथील मालवणी भागात एका बालिकेवर अत्याचार करून तिची हत्या केल्याबाबत

**(३८)** * **१४३३५ श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मालाड (मुंबई) येथील मालवणी भागातील ३० वर्षीय महिलेच्या १९ वर्षीय प्रियकराने ड्रग्जचे सेवन करुन संबंधित महिलेच्या अडीच वर्षाच्या मुलीवर बलात्कार करुन हत्या केल्याप्रकरणी दोघांना अटक केली असल्याचे माहे मे, २०२५ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने संबंधितांविरुद्ध व अशा घटना घडु नये यासाठी तसेच ड्रग्ज सेवनावर नियंत्रण आणण्यासाठी शासनाने ड्रग्ज माफियांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) व (२) खरे आहे,

सदर प्रकरणी मालवणी पोलीस ठाणे, मुंबई येथे गु.र.क्र.६०१/२०२५, कलम ७०, ६४, ६५ (२), ६६, १०३, २३८, ३ (५) भारतीय न्याय संहिता २०२३, सह कलम ६, १०, २१ पोक्सो अधिनियमान्वये दि.१९.०५.२०२५ रोजी गुन्हा नोंद करण्यात आला आहे. सदर गुन्ह्यात दोन आरोपींना अटक करण्यात येऊन सद्य:स्थितीत आरोपी न्यायालयीन कोठडीमध्ये आहेत.

(३) सन २०२४ पासून अद्यापपर्यंत मालवणी पोलीस ठाणेमध्ये एनडीपीएस कायद्यांतर्गत विविध प्रकारच्या ड्रग्ज विक्रेते यांचेवर खालीलप्रमाणे कारवाई करण्यात आली आहे.

सन २०२४

| **ड्रग्ज** | **दाखल गुन्हे** | **अटक आरोपी** | **जप्तमाल किलो.** | **किंमत** |
|---|---|---|---|---|
| गांजा | ३१ | ३४ | ३७.२३४ | १४,६६,१२०/- |
| एमडी | ०९ | ११ | ०.७३१ किग्रॅ. | १,२६,४८,५००/- |
| गर्द | ०८ | ०८ | ०.०७१ किग्रॅ. | १३,३७,०००/- |
| चरस | ०२ | ०२ | २.२०० किग्रॅ. | १,०४,००,०००/- |
| **एकूण** | **५०** | **५५** | **४०.२३६ किग्रॅ.** | **२५,८५१,६२०/-** |

सन २०२५

| **ड्रग्ज** | **दाखल गुन्हे** | **अटक आरोपी** | **जप्तमाल किलो.** | **किंमत** |
|---|---|---|---|---|
| **गांजा** | २१ | २६ | २०.५४२ किग्रॅ. | ०८,८५,७४०/- |
| **एमडी** | ०२ | ०२ | ०.०८७ किग्रॅ. | १२,९५,०००/- |
| **गर्द** | ०३ | ०४ | ०.००९ किग्रॅ. | ४८,०००/- |
| **चरस** | ०१ | ०१ | ०.०८५ किग्रॅ. | ९०,०००/- |
| **एकूण** | **२७** | **३३** | **२०.७२३ किग्रॅ.** | **२३,१८,७४०/-** |

सन २०२४ पासून अद्यापपर्यंत मालवणी पोलीस ठाणेमध्ये एनडीपीएस कायाद्यान्वये अंमलीपदार्थांचे सेवन करणारे इसमांविरुध्द खालीलप्रमाणे कारवाई करण्यात आली आहे.

| **सन** | **अंमलीपदार्थ सेवन करणारे इसमाविरुध्द दाखल गुन्हे** | **अटक आरोपी** |
|---|---|---|
| २०२४ | २५३ | २५३ |
| ३१ मे २०२५ अखेर | ७९ | ८० |
| **एकूण :-** | **३३२** | **३३३** |

मालवणी, मालाड (प), मुंबई येथे सातत्याने पोलीस पथकामार्फत नियमितपणे गस्त करुन पोलीस ठाणेंतर्गत बेकायदेशीर कृत्य तसेच अंमली पदार्थ व्यापाराबाबत खास गोपनीय बातमीदारांमार्फत माहिती काढून वेगवेगळया ठिकाणी छापा टाकून कारवाया केल्या जातात. त्यामध्ये आरोपींना अटक करुन त्यांच्यावर प्रभावी प्रतिबंधक कारवाई केली जाते. पोलीस ठाणेस्तरावर नियमितपणे कोंबींग ऑपरेशन राबवून विशेष मोहिमेंतर्गत अभिलेखावरील अंमली पदार्थांची विक्री करणाऱ्या आरोपींची तपासणी करण्यात येते. नियमितपणे आरोपीतांच्या हालचालीवर विशेष पथकांमार्फत लक्ष ठेवले जाते. त्यांच्या हालचाली संशयास्पद वाटल्यास त्यांची तात्काळ शहानिशा करुन योग्य ती कायदेशीर कारवाई करण्यात येते.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## खापरखेडा (जि.नागपूर) येथील औष्णिक वीज निर्मिती केंद्रामुळे होत असलेले वायु प्रदुषण

**(३९) * ११९४३ डॉ.आशिषराव देशमुख (सावनेर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) खापरखेडा (ता.सावनेर, जि.नागपूर) येथील पाचशे मेगावॅट औष्णिक वीज निर्मिती केंद्रातून मोठ्या प्रमाणात राख (ॲश) पसरुन व चिमण्यांतून घातक धूर सोडल्यामुळे स्थानिक नागरीकांना डोळयांची जळजळ, त्वचेच्या समस्या, श्वसनाचे आजार, फुफ्फुसाचे आजार तर वनस्पती व प्राण्यांचे आरोग्यास धोका निर्माण झाल्याचे माहे मे, २०२५ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी वारंवार तक्रार करुनही प्रशासनाचे याकडे दुर्लक्ष होत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुषंगाने संबंधितांविरुद्ध कारवाई करण्यासह वायु प्रदुषण रोखण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) व (२) हे खरे नाही.

खापरखेडा औष्णिक विद्युत केंद्रात अशा स्वरुपाची कोणतीही घटना निदर्शनास आलेली नाही. पर्यावरण विषयक सर्व मानकांचे या केंद्रामार्फत अनुपालन करण्यात येते. राख व्यवस्थापनासाठी आवश्यक उपाययोजना व कार्यवाही करण्यात येते. तसेच वायू प्रदूषण होऊ नये याकरीता प्रदूषण नियंत्रण उपकरणेही बसविण्यात आलेली आहेत.

(३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## नेवासा (जि.अहिल्यानगर) तालुक्यातील शनि शिंगणापुरमध्ये शनैश्वर देवस्थानात बनावट ॲपद्वारे होत असलेला गैरव्यवहार

**(४०) * १३१९९ श्री.अमोल खताळ (संगमनेर), श्री.हेमंत ओगले (श्रीरामपूर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नेवासा (जि.अहिल्यानगर) तालुक्यातील शनिशिंगणापुरात शनैश्वर देवस्थानाने भक्तांच्या सोयीसाठी मोबाईल ॲपच्या माध्यमातून ऑनलाईन शनिपूजा आणि शनिदर्शनाची स:शुल्क सुविधा उपलब्ध करून दिली असून, येथील काही कर्मचाऱ्यांनी बनावट ॲप तयार केले असल्याचे माहे मे, २०२५ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, भक्तांना ऑनलाईन शनिदर्शन घेता यावे यासाठी देवस्थानाने ही सेवा सुरु केली असून येथील कर्मचाऱ्यांनी बनावट ॲपच्या सहाय्याने नोंदणी केलेल्या सदस्यांकडून प्रत्येकी एक हजार आठशे रुपये जमा करून कोट्यवधी रुपयांचा गैरव्यवहार केल्याची तक्रार विविध धार्मिक संस्थांचे पदाधिकारी, भक्तगण यांनी मा.मुख्यमंत्री महोदय, मा.जिल्हाधिकारी (जि.धाराशिव) यांच्याकडे माहे मे, २०२५ मध्ये लेखी निवेदनाद्वारे करण्यात आली, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी प्राप्त होणारी रक्कम देवस्थानच्या तिजोरीत जमा न होता परस्पर कर्मचाऱ्यांच्या खासगी खात्यात जमा होत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने संबंधितांविरुद्ध कारवाई करण्यासह शनिशिंगणापूर देवस्थान सारख्या पवित्र ठिकाणी असलेल्या श्रद्धाळू भक्तगण यांची आर्थिक पिळवणूक थांबविण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय, हे खरे आहे.

तथापि, देवस्थानच्या विश्वस्तांना बनावट ॲपबाबत तक्रार प्राप्त झाल्याने दि.२२/०५/२०२५ पासून सदर सुविधा बंद करण्यात आली आहे.
(२) बनावट ॲप बाबत काही तक्रारी, मा.मुख्यमंत्री महोदय यांच्याकडे करण्यात आल्या आहेत, ही बाब खरी आहे.
(३) या बाबत धर्मादाय आयुक्त कार्यालयाकडे तक्रार प्राप्त असून त्याबाबत बनावट ॲप कोणी वापरले व इतर अनुषंगिक बाबींबाबत चौकशी सुरु आहे.
(४) सदर प्रकरणी निरक्षक चौकशी धर्मादाय आयुक्त कार्यालयाच्या स्तरावर सुरु असून, देवस्थानने संबंधितांवर सायबर व पोलीस स्टेशनमध्ये तक्रार दाखल केलेली असून याबाबत चौकशी चालू आहे. शनैश्वर देवस्थान शनिशिंगणापूर यांनी दिनांक २२/०५/२०२५ रोजी पासून भक्तगण यांची आर्थिक पिळवणूक थांबविणेसाठी देवस्थानने परवानगी दिलेले ऑनलाईन दर्शन व पूजा सेवा बंद केलेली आहे.
(५) लागू नाही.

-----------------

## जिल्हा कृषी अधिकारी, धाराशिव यांनी सेतू सुविधा केंद्रांवर एफ.आय.आर. दाखल केल्याबाबत

**(४१) * १३३१८ श्री.सुरेश धस (आष्टी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील विशेषत: नांदेड, लातूर, हिंगोली, परभणी, जालना व बीड जिल्ह्यातील शेतकऱ्यांनी मोफत पिक विमा रक्कम मिळण्यासाठी धाराशिव जिल्ह्यातील शासनाच्या विविध ठिकाणच्या जमिनीचे भूमापन क्रमांक टाकून पिक विमा अर्ज भरल्याचे नुकतेच निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी (धाराशिव) यांनी काही सेतू सुविधा केंद्रांवर एफ.आय.आर. दाखल केले आहेत, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, यासंदर्भात लाभार्थी शेतकरी, कंपनीचे प्रतिनिधी, संबंधित शासकीय अधिकारी व कर्मचारी यांना एफ.आय.आर. मध्ये सहआरोपी केले नसल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, याबाबतीत संबंधित जिल्ह्याचे जिल्हाधिकारी यांच्या सूचनेनुसार कृषि विभागाने तक्रार करुनही पोलीस निरीक्षक यांनी एफ.आय.आर. दाखल करून घेण्यास नकार दिला, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी करुन यातील सर्व दोषींविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) हे अंशत: खरे आहे.

सदर गुन्ह्यातील फिर्यादी जबाबावरुन बीड, औरंगाबाद, नांदेड, परभणी, सोलापुर व धाराशिव जिल्ह्यातील ऑनलाईन सेवा केंद्र चालकांनी धाराशिव जिल्ह्यातील २९९४.५४ हेक्टर शासकिय जमीन शेतकऱ्यांच्या मालकीची नसल्याचे तसेच सदरच्या शासकीय जमीनीशी कोणताही भाडेकरार/संमतीपत्र केलेला नसल्याचे माहित असुन सुध्दा ऑनलाईन सेवा केंद्र चालकांनी ११७० शेतकऱ्यांचे नावे बनावट सातबारे व ८-अ चे उतारे तयार करुन ते खरे आहे असे दाखवुन फसवणुक केल्याचे निदर्शनास आले आहे.

(२) होय, हे खरे आहे.

सदर प्रकरणी उपसंचालक, जिल्हा अधिक्षक, कृषी अधिकारी कार्यालय, धाराशिव यांच्या फिर्यादी जबाबावरुन पोलीस स्टेशन, आनंदनगर येथे गु.र.क्र. ११८/२०२४ भा.दं.वि. कलम ४२०, ५११, ४१७, ४१८, ४६५, ४६७, ४६८, ४७१ प्रमाणे गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

(३) सदर गुन्ह्याच्या फिर्यादी जबाबावरुन फक्त दोषी ऑनलाईन सेवा केंद्र चालक यांच्या विरुध्द गुन्हा नोंद करण्यात आला आहे. सदर गुन्ह्यात इतरांना सहआरोपी करण्यात आलेले नाही. परंतु चौकशी करुन इतरांच्या सहभागा बद्दल तपास करण्यात येत आहे.

(४) हे खरे नाही.

कृषी विभागाकडुन तक्रार प्राप्त होताच वरिलप्रमाणे गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

(५) सदर प्रकरणी चौकशी केली असता, फिर्यादीमध्ये शासनाची रु.३,१३,७१,६३५/- इतक्या रकमेची गैरहानी केल्याचे नमुद असले तरी तपासामध्ये शासनाची कोणतीही रक्कम विमा कंपनीला वर्ग केल्याचे आढळुन आले नाही.

तसेच सदर गुन्ह्यात एकुण २४ आरोपी निष्पन्न झाले असुन आरोपींताविरुध्द दोषारोपपत्र मा.न्यायालयात दाखल करण्यात आले आहे. तथापी, सदर गुन्ह्यात फरार असलेल्या एकुण ३ आरोपींचा शोध सुरु आहे.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## बीड येथील पोलिस वसाहतीमध्ये बांधलेल्या नवीन घरांचे काम निकृष्ट दर्जाचे केल्याबाबत

**(४२) * १३२९६ श्री.संदिप क्षीरसागर (बीड) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बीड (जि.बीड) येथील पोलिस वसाहतीमध्ये नवीन घरांचे बांधकाम करण्यात आले असून दिनांक १४ मे, २०२५ रोजी झालेल्या अतिवृष्टीमुळे या घरांचे अतोनात नुकसान झाल्याने दोन लहान मुली जखमी झाल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी पोलिस अधिक्षकांनी घटनास्थळी जाऊन पाहणी केली असता बांधण्यात आलेल्या नवीन घरांचे बांधकाम निकृष्ट दर्जाचे केल्यामुळे धनश्री बिल्डकॉन या बांधकाम करणाऱ्या कंपनी व कंत्राटदाराविरुद्ध गुन्हे नोंदविण्याचे निर्देश पोलिस अधिक्षकांनी दिले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच याच कंपनीच्या कंत्राटदाराने शहर पोलिस ठाणे बीड या इमारतीचेही बांधकाम केले असुन ते बांधकाम देखील निकृष्ट दर्जाचे केल्याने त्यांच्याविरुद्ध यापुर्वी देखील तक्रारी करण्यात आल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने संबंधित कंपनी व कंत्राटदाराविरुद्ध कोणती कारवाई केली वा करण्यात येणार आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय.

(२) होय, पोलिस अधिक्षकांनी घटनास्थळी जाऊन पाहणी केली आहे व पोलीस वसाहतीतील रहिवासी पोलीस अंमलदार यांनी दिलेल्या तक्रारीवरुन पोलीस गृहनिर्माण महामंडळाच्या धनश्री बिल्डकॉम प्रायव्हेट लिमीटेड कंत्राटदाराविरुद्ध पोलीस स्टेशन, शिवाजीनगर येथे गु.र.नं. २६९/२०२५ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

(३) नाही.

पोलीस ठाणे, बीड शहर याचे बांधकाम शिवेंद्र कंस्ट्रक्शन धाराशिव यांनी केले आहे.

(४) सदर घटनेच्या अनुषंगाने पोलीस गृहनिर्माण महामंडळाच्या धनश्री बिल्डकॉम प्रायव्हेट लिमीटेड कंत्राटदाराविरुद्ध पोलीस स्टेशन, शिवाजीनगर येथे गु.र.नं. २६९/२०२५ प्रमाणे गुन्हा दाखल केला आहे. तसेच या कंत्राटदारामार्फत प्रकल्प सल्लागारांच्या मार्गदर्शनाखाली सर्व दुरुस्ती करण्यात आली असून इमारती सध्या सुस्थितीत असून पोलीस रहिवासी वास्तव्यास आहेत.
(५) विलंब झालेला नाही.

-----------------

## सांगली जिल्ह्यातील शहर व ग्रामीण भागात नागरिकांची कोट्यवधी रुपयांची केलेली फसवणूक

**(४३) * ७८७० श्री.विश्वजित कदम (पलूस कडेगाव), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.संजय मेश्राम (उमरेड) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सांगली जिल्ह्यातील शहर व ग्रामीण भागात शेअर बाजारातील कंपन्यांमध्ये पैसे गुंतवणूक करुन दामदुप्पटीच्या अमिषाने नागरिकांची वर्षभरात २२ कोटींची फसवणूक केल्याबाबत माहे मे, २०२५ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरील प्रकरणाची सांगली शहर व ग्रामीण भागातील पोलीस स्टेशनमध्ये गुन्हे दाखल करण्यात आले आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्या अनुषंगाने संबंधितांविरुद्ध कारवाई करण्यासह अशा प्रकाराला आळा घालण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय, हे खरे आहे.

सांगली जिल्ह्यातील शहर व ग्रामीण भागात शेअर बाजारातील कंपन्यांमध्ये पैसे गुंतवणुक करुन दामदुप्पट परतावा देण्याचे अमिष दाखवुन नागरिकांची फसवणुक केल्याचे निदर्शनास आले आहे.
(२) व (३) सदर फसवणुकीबाबत तक्रारी प्राप्त झाल्याने तक्रारींच्या अनुषंगाने सांगली जिल्हा घटकामध्ये सन २०२४ मध्ये ०६ गुन्हे व सन २०२५ मध्ये ०३ गुन्हे दाखल करण्यात आले आहे.

| अ.क्र | सन २०२४ | सन २०२५ |
|---|---|---|
| १ | ०३/२०२४ भा.द.वी कलम ४२०, ४०६, ३४ | १७०/२०२५ भा.द.वी कलम ४२०,३४ एम.पी.आय.डी क.३ |
| २ | ३६/२०२४ भा.द.वी कलम ४२०, ४०६, एम.पी.आय.डी क.३ | ३१/२०२५ भा.द.वी कलम ४२०,३४ |
| ३ | १५७/२०२४ भा.द.वी कलम ४२०, ४०६, ४०९,३४ एम.पी.आय.डी क.३ | ९३/२०२५ भा.द.वी कलम ४२०, ४०६, ३४ |
| ४ | ०२/२०२४ भा.द.वी कलम ४२०, ४०६ | |
| ५ | ६७/२०२४ भा.द.वी कलम ४२०, आयटीॲक्ट ६६ सीडी | |
| ६ | ४४/२०२४ भा.द.वी कलम ४२०, ४०६, ४०९, ३४ एम.पी.आय.डी क.३ | |

शहर व ग्रामीण भागात झालेल्या फसवणुकीबाबत उपरोक्त प्रमाणे गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. तसेच अशा प्रकाराला आळा घालण्यासाठी नागरिकांमध्ये जनजागृती करण्यात येत आहे.

तसेच जास्तीचा नफा देण्याचे प्रलोभन दाखवुन आर्थिकदृष्टया फसवणुक करण्याच्या योजनांबाबत आगाऊ माहिती प्राप्त करुन अशा कंपन्यांविरुध्द कारवाई करण्याकरिता सांगली जिल्हा घटकात आर्थिक गुप्तवार्ता कक्षाची स्थापना करण्यात आली आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मौजे शिरपुर (ता.वणी, जि.यवतमाळ) येथील देवस्थानचे अध्यक्ष व सचिव यांनी केलेला गैरव्यवहार

**(४४) * १३३७७ श्री.संजय देरकर (वणी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे शिरपुर (ता.वणी, जि.यवतमाळ) येथील श्री कैलास शिखर देवस्थानचे अध्यक्ष व सचिव यांनी नियमबाह्य व अनधिकृपणे पदे अधिग्रहीत करुन "लकी ड्रॉ" मध्ये आर्थिक गैरव्यवहार करुन शासनाची व जनतेची फसवणूक करुन सुमारे ९ लाख रुपयांचा गैरव्यवहार केल्याची तक्रार ग्रामस्थांनी मा.मुख्यमंत्री महोदय व मा.धर्मादाय आयुक्त, अमरावती यांचेकडे वारंवार लेखी निवेदनाव्दारे केलेली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने सखोल चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने संबंधितांविरुद्ध कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय, हे खरे आहे.

श्री.खुशाल जानबा बोबडे व इतर ग्रामस्थांनी दिनांक १२/११/२०१८ रोजी शिखर देवस्थानचे अध्यक्ष व सचिव यांनी नियमबाह्य व अनधिकृतपणे पदे अधिग्रहित करून शासनाची व जनतेची फसवणूक करून सुमारे ९ लाख रुपयांचा गैरव्यवहार केल्याबाबतची तक्रार दिलेली होती.

(२) सदर प्रकरणी धर्मादाय आयुक्त कार्यालयातील निरीक्षक यांनी सखोल चौकशी करून निरीक्षक अहवाल सहाय्यक धर्मादाय आयुक्त, यवतमाळ यांना सादर केला आहे. सदर प्रकरण वादातीत असल्याने न्यायप्रविष्ट आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## वर्धा (जि.वर्धा) नदी पात्रातील काही भागात होणारे प्रदूषण रोखण्याबाबत

**(४५) * ९०९० श्री.सुधीर मुनगंटीवार (बल्लारपूर) :** सन्माननीय **पर्यावरण व वातावरणीय बदल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वर्धा (जि.वर्धा) नदीच्या पात्रातील काही भाग प्रदूषित होवून पाणी दूषित झाल्याचे महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ आणि लोकमत. कॉम यांच्या अहवालानुसार माहे एप्रिल, २०२५ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, घुग्गुस ते राजुरा दरम्यानचे ४२ किमी पात्र प्रदूषित झाले असून अनेक औद्योगिक कंपन्यांकडून दूषित पाणी, शहरी व ग्रामीण भागातून येणारे सांडपाणी, खते आणि कीटकनाशके यांचा वापर केलेले पाणी कोणतेही प्रक्रिया न करता नदीत सोडल्याने तसेच रेती उत्खनन केल्याने माती आणि इतर कचरा पाण्यात मिसळून मोठ्या प्रमाणात नदीतील पाणी दूषित झाले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, दूषित पाण्यामुळे परिसरातील नागरिकांना आरोग्याच्या समस्या निर्माण झाल्या असून त्याकरिता कोणत्या प्रतिबंधात्मक उपाययोजना करण्यात आल्या आहेत,
(४) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी करुन वर्धा नदीचे होणारे प्रदूषण रोखण्याकरीता कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) हे अंशतः खरे आहे.

महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळाकडून प्राप्त अहवालानुसार माहे जानेवारी-२०२४ ते मे-२०२५ या कालावधीतील संकलित केलेल्या वर्धा नदीच्या पाण्याच्या नमुन्यांच्या पृथःकरण अहवालानुसार बी.ओ.डी. चे प्रमाण विहीत मर्यादेपेक्षा अंशतः अधिक प्रमाणात असल्याचे आढळून आले आहे.
(२) हे अंशतः खरे आहे.

महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळाकडून प्राप्त अहवालानुसार बल्लारपूर, घुग्गुस व राजुरा नगरपरिषद क्षेत्रातून निर्माण होणारे घरगुती सांडपाणी विनाप्रक्रिया वर्धा नदीत मिसळते.

महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ यांच्याकडून प्राप्त अहवालानुसार घुग्गुस ते राजुरा दरम्यान महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळातर्फे कोणतेही औद्योगिक क्षेत्र विकसीत करण्यात आलेले नाही.

जिल्हा खनिकर्म अधिकारी, चंद्रपूर यांच्याकडून प्राप्त अहवालानुसार रेती उत्खननामुळे नदीतील पाणी दुषित झाल्याबाबत कोणतीही तक्रार त्यांच्या कार्यालयाकडे प्राप्त झालेली नाही.
(३) जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद, चंद्रपूर यांच्याकडून प्राप्त अहवालानुसार प्राथमिक आरोग्य केंद्र घुग्गुस व तालुका राजुरा येथील मागील ३ वर्षांच्या माहितीच्या अनुषंगाने आजाराच्या प्रमाणांमध्ये सतत वाढ किंवा घट झाल्याचे आढळून येत नाही.
(४) महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळामार्फत वर्धा नदीचा कृती आराखडा तयार केला असून सदर कृती आराखडा केंद्रिय प्रदुषण नियंत्रण मंडळास सादर करण्यात आला आहे.

सदर कृती आराखड्याची अंमलबजावणी संबंधित नागरी संस्थाकडून करण्यात येत आहे. त्यानुसार बल्लारपूर नगरपरिषदेकडून सांडपाणी प्रक्रिया प्रकल्पाचे काम प्रगतीपथावर असून घुग्गुस व राजुरा नगरपरिषदेचे सांडपाणी प्रक्रिया प्रकल्प प्रस्तावित आहेत.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील कारागृहामध्ये रेशन, कॅन्टीन आणि विद्युत उपकरणांच्या खरेदीत झालेला गैरव्यवहार

**(४६) * १२२६६ श्री.बापूसाहेब पठारे (वडगाव शेरी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील कारागृहातील रेशन, कॅन्टीन आणि विद्युत उपकरणांच्या खरेदीत जवळपास ५०० कोटी रुपयांचा गैरव्यवहार झाल्याचे दिनांक २९ मे, २०२५ रोजी निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, पुणे जिल्ह्यातील येरवडा कारागृहाचे अधीक्षक यांनी दिनांक २१ सप्टेंबर, २०२४ रोजी साहित्य पुरवठा करण्याचे पत्र दिले असता, पुरवठा ठेकेदार व अधिकारी यांनी संगनमताने पुरवठा आदेशाने निविदा प्रसिद्ध होण्याआधीच सुमारे २ कोटी ५५ लाख ८९ हजार ४४० इतक्या रकमेचे साहित्य खरेदी केल्याची बाब निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त गैरव्यवहाराबाबतची माहिती मा.मुख्यमंत्री तथा गृहमंत्री, मुख्य सचिव, सचिव गृह विभाग यांना देऊन तीन महिने झाले असून अद्याप या प्रकरणी कोणतीच कारवाई करण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने सखोल चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने संबंधित अधिकारी व ठेकेदारांविरुद्ध कोणती कारवाई केली वा करण्यात येतआहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) हे खरे नाही.

राज्यातील कारागृहांमध्ये रेशन, कॅन्टीन व विद्युत उपकरणांच्या खरेदीमध्ये गैरव्यवहार झालेला नाही. सन २०२३-२४ व २०२४-२५ या आर्थिक वर्षांमध्ये रेशन व विद्युत उपकरणांची एकूण रु.४४८.०९ कोटी खरेदी अपर पोलीस महासंचालक (अपोमसं),कारागृह यांच्या स्तरावरुन करण्यात आली आहे. सदर खरेदीचा तपशील खालीलप्रमाणे आहे :

**अ) विद्युत उपकरणे:**

| बाब | खरेदी केलेल्या वस्तू | वर्ष निहाय खरेदी (रु.कोटी) | | एकूण खरेदी (रु.कोटी) |
|---|---|---|---|---|
| | | २०२३-२४ | २०२४-२५ | |
| १.सुरक्षा उपकरणे | सीसीटीव्ही | ५१.३८ | १९.४६ | ७०.८४ |
| | डिझेल जनरेटर | २.०९ | ० | २.०९ |
| | टिव्ही | ४.८१ | ४.९४ | ९.७५ |
| | पॅनिक बटन | ० | २८.३६ | २८.३६ |
| **एकूण(१)** | | **५८.२८** | **५२.७६** | **१११.०४** |
| २.व्हिडिओ कॉन्फरन्सिंग उपकरणे | व्हि.सी.संच | ७३.०० | ८.५५ | ८१.५५ |
| **एकूण (२)** | | **७३.००** | **८.५५** | **८१.५५** |
| ३. संगणकीकरण | संगणक उपकरणे | ३७.७५ | ४.६४ | ४२.३९ |
| **एकूण (३)** | | **३७.७५** | **४.६४** | **४२.३९** |
| ४.वैद्यकीय उपकरणे | वॉशिंग मशीन | ५.१७ | ० | ५.१७ |
| | वॉटर कुलर | **०** | **२.७७** | **२.७७** |
| **एकूण(४)** | | **५.१७** | **२.७७** | **७.९४** |
| **एकूण(१+२+३+४)** | | **१७४.२०** | **६८.७२** | **२४२.९३** |

अ.क्र. १ ते ४ येथे नमूद विद्युत उपकरणांची खरेदी ही प्रशासकीय मान्यतेनुसार e-निविदा प्रक्रिया राबवून GeM पोर्टल व Mahatender पोर्टलवरुन मंजूर निधीच्या मर्यादेत अपोमसं (कारागृह) यांचे मार्फत करण्यात आलेली आहे.

**ब) रेशन खरेदी :**

सदर खरेदी अपोमसं (कारागृह), यांचे मार्फत महाटेंडर प्रणालीद्वारे २ वर्षांसाठी निविदा प्रक्रीया राबवून केली आहे.

| बाब | वर्ष निहाय खरेदी (रु. कोटी) | | | एकूण खरेदी (रु. कोटी) |
|---|---|---|---|---|
| | २०२३-२४ | २०२४-२५ | | |
| | ०१.०४.२०२३ ते ३१.०३.२०२४ | ०१.०४.२०२४ ते सप्टे.२०२४ (पूर्वीच्या निविदा प्रक्रीयेनुसार) | ऑक्टो.२०२४ ते मार्च २०२५ (नवीन निविदा प्रक्रीयेनुसार) | |
| **रेशन** | **९८.३०** | **६६.२४** | **४०.६१** | **२०५.१५** |

**<u>क) कॅन्टीन खरेदी:</u>** अपोमसं (कारागृह), यांच्या स्तरावरुन ही खरेदी बंद्यांच्या खाजगी खर्चातून M/s NCCF (National Co-operative Consumer Federation) यांचेमार्फत करण्यात आलेली असून, **त्यामध्ये शासन निधीचा समावेश नाही.**

| बाब | वर्ष निहाय खरेदी (रु. कोटी) | | एकूण खरेदी माहे नोव्हेंबर २०२३ ते माहे जून २०२५ (रु. कोटी) |
|---|---|---|---|
| | दि. २२.११.२०२३ ते दि. ३०.११.२०२४ | दि. १.१२.२०२४ ते माहे जून, २०२५ | |
| **कॅन्टीन** | **४४.८१** | **२२.५२** | **६७.३३** |

M/s NCCF यांना दि.२२.११.२०२३ ते दि.३०.११.२०२४ या कालावधीत कॅन्टीन वस्तू पुरवठा करण्याकरीता प्रायोगिक तत्वावर अपोमसं (कारागृह), यांनी नियुक्त केले(विना निविदा). तद्नंतर केंद्रिय पध्दतीने संपूर्ण महाराष्ट्रातील कारागृहांसाठी महाटेंडर प्रणालीवर निविदा प्रक्रिया राबवून, L-१ निविदाकार, M/s NCCF यांना दि. ०१.१२.२०२४ ते ३१.०३.२०२६ ( दोन वर्ष कालावधीकरता) कॅन्टीन वस्तू पुरवठा करण्यासाठी नियुक्त करण्यात आले आहे.

(२) हे खरे नाही.

- गृह विभाग शासन निर्णय दिनांक १५.०३.२०२४ नुसार, रेशन खरेदीची प्रक्रिया राबविण्यात आली आहे.
- निविदेची जाहिरात दिनांक ०३.०८.२०२४ रोजी प्रसिद्ध करण्यात आली.
- अंतिम सादरीकरणाची मुदत दिनांक २६.०८.२०२४ होती.
- व्यापारी लिफाफे दिनांक १३.०९.२०२४ रोजी उघडण्यात आले व L-१ निविदाकारास निविदा स्वीकृती देण्यात आली.
- सुरक्षा अनामत व बॅंक गॅरंटी जमा झाल्यानंतर नियमानुसार दिनांक २०.०९.२०२४ रोजी (दोन वर्षांसाठी)पुरवठा आदेश देण्यात आले.

येरवडा मध्यवर्ती कारागृहात धान्यसाठा संपल्यामुळे नवीन पुरवठादारास तातडीने साहित्य पुरविण्याचे सूचित करण्यात आले होते. त्यानुसार दिनांक २३.०९.२०२४ रोजी माल प्राप्त झाला आहे.

(३) व (४) प्रस्तुत खरेदी प्रक्रियेत अनियमितता झाल्याबाबत शासनास प्राप्त तक्रारीच्या अनुषंगाने अपोमसं (कारागृह), यांच्याकडून मागविण्यात आलेला अहवाल शासनास दिनांक ३०.०६.२०२५ रोजी प्राप्त झाला आहे. सदर अहवालानुसार खरेदी प्रक्रीयेत कोणतीही अनियमितता झालेली नाही.

तसेच, सदर प्रकरणी मा.उच्च न्यायालय, खंडपीठ, मुंबई येथे आहार गट- १ (अन्नधान्य) करीता खालील याचिका दाखल करण्यात आल्या होत्या -

१) दिवाणी याचिका क्र.१३३११/२०२४ नॅशनल फेडरेशन ऑफ फार्मर्स प्रोक्योरमेंट, प्रोसेसिंग अँड रिटेलिंग कोऑपरेटिव्ह ऑफ इंडिया लिमिटेड (मे.नेकॉफ) वि. महाराष्ट्र शासन व

२) दिवाणी याचिका क्र.१४३४३/२०२४ मे. मारिया महिला बचत गट, उदगीर वि. महाराष्ट्र शासन.

या दोन्ही याचिकांमध्ये याचिकाकर्ते यांनी निविदा प्रक्रियेबाबत आक्षेप नोंदविला होता. परंतु, सदर याचिकांमध्ये मा. न्यायालयास योग्यता दिसून न आल्याने, मा. न्यायालयाने दि.०४.०७.२०२५ रोजीच्या न्याय निर्णयान्वये दोन्हीही याचिका निकाली काढल्या आहेत.

गट-२ करिता उपविभाग निहाय राबविण्यात आलेल्या निविदा प्रक्रियेत यशस्वी न्युनतम दरधारक निविदाकार मे. नॅकॉफ, मे. गृहलक्ष्मी तेल आणि किराणा व मे. व्ही. एम. डिस्ट्रिब्युटर्स यांनी काही वस्तुंचे दर बाजारदरांपेक्षा अत्यल्प दिल्याचे निदर्शनास आल्याने अपोमसं (कारागृह), यांनी गट-२ च्या निविदा रद्द करुन नव्याने फेर निविदा प्रसिद्ध केल्या. सदर निर्णयाच्या विरुद्ध मे. नेकॉफ (१३५७२/२०२४), मे. व्ही. एम. डिस्ट्रिब्युटर्स (१३७८३/२०२४) व मे. गृहलक्ष्मी तेल आणि किराणा (१३९५६/२०२४) या निविदाकारांनी मा. उच्च न्यायालय, मुंबई येथे ३ स्वतंत्र रिट याचिका दाखल करुन आव्हान दिले. मा. उच्च न्यायालयात अपोमसं (कारागृह) यांनी न्युनतम दरधारक (L१) यांना पुरवठा आदेश देण्याचे मान्य केल्याने मा. न्यायालयाने दि. २२.१०.२०२४ रोजी सदर याचिका निकाली काढल्या आहेत. फेर निविदा रद्द करुन मुळ निविदाकारांना खालील प्रमाणे खरेदी आदेश देण्यात आले आहेत-

| **निविदाकार (L १)** | **मे. व्ही. एम. डिस्ट्रीब्युटर्स** | **मे.गृहलक्ष्मी तेल आणि किराणा** | **मे.नॅकॉफ** |
|---|---|---|---|
| **पुरवठा आदेश दिलेल्या उप विभागाचे नाव** | पुणे व नाशिक | नागपूर व छत्रपती संभाजी नगर | मुंबई |

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**राज्यात दुध उत्पादन वाढीसाठी पशुखाद्यात भेसळ होत असल्याबाबत**

**(४७) * ७१७६ श्री.काशिनाथ महादु दाते (पारनेर), श्रीमती मोनिका राजळे (शेवगांव) :** सन्माननीय **पशुसंवर्धन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात दुध उत्पादन वाढीसाठी वापरल्या जाणाऱ्या युरीया, अमोनिया, मेलामाईन, भेसळयुक्त मिनरल मिक्सर, साखरेचे ऊर्जायुक्त घटक, सिंथेटिक रंग, पोल्ट्रीचा कचरा इत्यादी विषारी पदार्थाची भेसळ करुन येत असल्याने ते पशुखाद्य दुधाळ गाई-म्हैस व मानवी आारोग्याला घातक असल्याचे दिनांक २७ मार्च, २०२५ रोजी निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पशुखाद्य मानके निश्चित केली असली तरी त्यांची अंमलबजावणी होत नसल्याने पशुखाद्याच्या गुणवत्तेवर नियंत्रण ठेवणारी प्रभावी यंत्रणा नसल्याचे व बहुतांश पशुखाद्य उत्पादक हे FSSAI किंवा BIS प्रमाणपत्र न घेता खाद्य उत्पादन करीत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी करुन दुधाळ जनावरे व दुधापासून मानवी आरोग्याला घातक असणारे भेसळयुक्त पशुखाद्यावर नियंत्रण आणण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) व (२) अंशत: खरे आहे.

(३) केंद्र शासनाच्या फुड सेप्टी ॲन्ड स्टँडर्स ऑफ इंडिया या संस्थेने आय.एस. आय. (बी.आय.एस. प्रमाणकाप्रमाणे) पशुखाद्याचे उत्पादन व विक्री करणे दि.१७.१२.२०१९ व दि.२७.०१.२०२० च्या पत्रान्वये बंधनकारक केले आहे. तसेच पशुखाद्याच्या उत्पादनासाठी व विक्रीसाठी भारतीय मानक संस्थेचा (बी.आय.एस.) परवाना घेणे आवश्यक आहे. उत्पादन / विक्री करण्यात येणारे पशुखाद्य हे बी.आय.एस. मानकाप्रमाणे नसल्यास त्यांच्याविरुध्द कारवाई करण्याचे अधिकार केंद्र शासनाच्या फुड सेप्टी ॲन्ड स्टँडर्स ऑफ इंडिया या संस्थेस आहे.

राज्यातील पशुधनास चांगल्या प्रतीचे पशुखाद्य उपलब्ध व्हावे, यासाठी राज्य शासनाने दि.१४.०७.२०२३ च्या शासन निर्णयान्वये उत्पादित होणाऱ्या सर्व प्रकारच्या पशुखाद्यांचे यादृच्छिकपणे (रँडमली) नमुने घेवून, सदर पशुखाद्य नमुन्यांची शासन मान्यताप्राप्त प्रयोगशाळेकडून नियमितपणे तपासणी करण्याचे निर्देश पशुसंवर्धन विभागातील यंत्रणेस दिले आहे. तपासणीअंती मानकाप्रमाणे पशुखाद्य उत्पादन न करणाऱ्या उत्पादकांविरुध्द कायदेशीर कारवाई करण्यासाठी फुड सेप्टी ॲन्ड स्टँडर्स ऑफ इंडिया या संस्थेस अहवाल सादर करण्याचेही निर्देश देण्यात आले आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**ठाणे महानगरपालिकेच्या उपायुक्त आणि मुंबई महानगर प्रदेश झोपडपट्टी पुनर्वसन विभागातील सक्षम प्राधिकारी यांच्याकडे कथित पत्रकार व माहिती अधिकार कार्यकर्त्याने खंडणी मागितल्याबाबत**

**(४८) * १३११४ श्री.जयंत पाटील (इस्लामपूर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) ठाणे महानगरपालिकेच्या उपायुक्त आणि मुंबई महानगर प्रदेश झोपडपट्टी पुनर्वसन विभागातील सक्षम प्राधिकारी श्रीमती मीनल पालांडे यांच्याकडे कथित पत्रकार तथा माहिती अधिकार कार्यकर्त्याने २५ लाखांची खंडणी मागितल्याचे माहे मे, २०२५ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर प्रकरणी चितळसर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी दाखल केलेल्या गुन्ह्याच्या अनुषंगाने शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुषंगाने उक्त पत्रकाराविरुद्ध शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय, हे अंशत: खरे आहे.
(२) होय, हे खरे आहे.
(३) सदर प्रकरणी चितळसर पोलीस ठाणे, ठाणे शहर येथे दि. ३०.०४.२०२५ रोजी गु.र.नं. १७३/२५, भारतीय न्यायसंहिता २०२३ मधील कलम ३०८(२), ३०८(३), ७८, ७९, ३५१ (२) अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे. त्याचा तपास खंडणी विरोधी पथक, गुन्हे शाखा, ठाणे शहर हे करत आहेत. सदर गुन्ह्यातील पाहिजे आरोपीने मा. उच्च न्यायालय, मुंबई येथे एबीए १४४७/२०२५ दाखल केला असून त्यावर सुनावणी होईपर्यत इंटेरीम अर्ज मंजूर केला आहे. याप्रकरणाची पुढील सुनावणी दिनांक २८.०७.२०२५ रोजी होणार आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**पुणे जिल्ह्यातील गोखले राज्यशास्त्र आणि अर्थशास्त्र संस्थेतील निधी नियमबाह्य पद्धतीने वळवुन गैरव्यवहार केल्याबाबत**

**(४९) * १४०११ श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पुणे जिल्ह्यातील गोखले राज्यशास्त्र आणि अर्थशास्त्र संस्थेतील १ कोटी ४२ लाख रुपयांचा निधी नियमबाह्य पद्धतीने वळवुन गैरव्यवहार केल्याप्रकरणी सर्व्हंटस ऑफ इंडिया सोसायटीचे सचिव, श्री.मिलिंद देशमुख यांचेविरुद्ध डेक्कन पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करुन दिनांक ७ एप्रिल, २०२५ रोजी पोलिसांनी अटक केली आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच आरोपी श्री.देशमुख यांनी न्या.महादेव गोंविद रानडे चॅरिटी ट्रस्टची हडपसर परिसरातील शेवाळवाडी येथील जमीन बळकावल्याप्रकरणी पोलिसात गुन्हा दाखल करण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणांची शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीचे निष्कर्ष काय आहेत व त्यानुषंगाने संबंधितांविरुद्ध कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) व (२) हे खरे आहे.
(३) गोखले इन्स्टीट्यूट ऑफ पॉलिटिक्स अॅन्ड इकॉनामिक्स या संस्थेकडे प्राप्त शासकीय अनुदान व फीच्या रक्कमेतुन सुमारे १ कोटी ४२ लाख रुपये इतकी रक्कम सर्व्हटस ऑफ इंडिया सोसायटीच्या इतर सदस्यांची पुर्वपरवानगी न घेता तसेच, युजीसीच्या एम.ओ.ए. च्या नियमांचे उल्लंघन करुन सर्व्हंट्स ऑफ इंडीया सोसायटीची नागपुर येथील जमीन फ्री होल्ड करण्यासाठी वापरुन तसेच सदर हस्तांतरणाच्या इतर खर्चापोटी ४० लाख रुपये खर्च करुन स्वतःच्या आर्थिक फायद्यासाठी संस्थेची फसवणुक करून अपहार केल्याबाबत प्राप्त तक्रारीवरून पोलीस आयुक्त, पुणे शहर यांच्या कार्यक्षेत्रातील डेक्कन पोलीस स्टेशन येथे दि. ०४.०४.२०२५ रोजी भा.दं.वि. कलम ४०६, ४०९, ४२०, १२० (ब), ३४ प्रमाणे गु.र.नं. ६४/२०२५ गुन्हा दाखल करुन गुन्ह्यातील आरोपीस दि.०५.०४.२०२५ रोजी अटक करण्यात आली आहे. सदर गुन्ह्यातील आरोपीस दिनांक १९.०४.२०२५ रोजी जामीन मंजूर करण्यात आलेला आहे.

कै.न्यायमूर्ती महादेव गोविंद रानडे चॅरिटी ट्रस्टच्या मालकीच्या मौजे शेवाळेवाडी, ता.हवेली, जि.पुणे येथील जमीनीचे बनावट कागदपत्र तयार करून स्वतःच्या नावे नोंद करून फिर्यादी आणि ट्रस्टची फसवणूक केल्याच्या प्राप्त तक्रारीवरून सोसायटीचे सचिव व अन्य दोघांविरुद्ध डेक्कन पोलीस स्टेशन, पुणे शहर येथे दिनांक १७.०७.२०२४ रोजी भा.दं.वि. च्या कलम ४१९,४२०,४६७,४६८, १२०(ब) अन्वये गुन्हा क्रमांक ११०/२०२४ दाखल करण्यात आला आहे.सदर गुन्ह्याच्या तपासामध्ये निष्पन्न आरोपींना दिनांक ०७.०८.२०२४ रोजी अंतरीम अटकपूर्व जामीन मंजूर आहे. प्रस्तुत गुन्ह्याचा तपास सुरू आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## दहिसर (मुंबई) येथील गणपत पाटील नगरमध्ये पूर्व वैमनस्यातून तिघांची केलेली हत्या

**(५०)** * **१४३४० श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) दहिसर (मुंबई) येथील गणपत पाटील नगरमध्ये पूर्व वैमनस्यातून दोन कुटुंबातील वादातून व ड्रग्ज, दारुच्या व्यसनातून तिघांची हत्या झाल्याची घटना माहे मे, २०२५ मध्ये घडली असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,
(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने अशा घटना घडु नयेत तसेच ड्रग्ज सेवनावर नियंत्रण आणण्यासाठी ड्रग्ज माफियांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे.
(४) नसल्यास, विलंबची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) व (२) होय, हे खरे आहे.

सदर प्रकरणी दोन कुटूंबियांच्या परस्पर विरोधात गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. एम.एच.बी. कॉलनी पोलीस ठाणे, बृहन्मुंबई शहर येथे दि.१८.०५.२०२५ रोजी गु.र.क्र.२९९/२०२५, भारतीय न्यायसंहिता, २०२३

मधील कलम १०३, १०९, ११८(१), ३(५), सह शस्त्र अधिनियम, १९५९ मधील कलम ४, २५, सह महाराष्ट्र पोलीस अधिनियम १९५१ मधील कलम ३७ (१), १३५ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तसेच एम.एच.बी. कॉलनी पोलीस ठाणे, बृहन्मुंबई शहर येथे दि.१९.०५.२०२५ रोजी गु.र.क्र.३००/२०२५ मध्ये भारतीय न्यायसंहिता २०२३ मध्ये कलम १०३, १०९, ११८(१), ११५(२), ३(५) सह शस्त्र अधिनियम, १९५९ मधील कलम ४, २५, सह महाराष्ट्र पोलीस अधिनियम १९५१ मधील कलम ३७ (१), १३५ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. दोन्ही गुन्हयात आरोपींना अटक करण्यात आली असुन सदर गुन्हे तपासाधीन आहेत.

(३) सदर घटना दोन कुटूंबातील पूर्व वैमनस्यातून घडल्याचे चौकशीत निष्पन्न झाले आहे. एम.एच.बी. कॉलनी पोलीस ठाणे येथे सन २०२४ पासून माहे मे, २०२५ अखेर एनडीपीएस कायद्यांतर्गत गांजा, एमडी, चरस, गर्द इत्यादी विविध प्रकारच्या ड्रग्स विक्रेते यांच्याविरुध्द एकूण १२ गुन्हे दाखल करण्यात आले असून १३ आरोपींना अटक व ०२ आरोपींवर प्रतिबंधात्मक कारवाई करण्यात आली आहे. तसेच १८३७ कि.ग्रॅम. मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. तसेच अंमली पदार्थाचे सेवन करणाऱ्या इसमांविरुध्द सन २०२४ पासून माहे मे, २०२५ अखेर एकूण ९४ गुन्हे दाखल करण्यात आले असून एकूण ९७ आरोपींना अटक करण्यात आली आहे. सदर गुन्हे न्यायप्रविष्ठ आहेत. एम.एच.बी.कॉलनी पोलीस ठाणे यांच्यामार्फत स्थानिक नागरीकांनी ड्रग्जच्या आहारी जावु नये याकरीता नियमीतपणे जनजागृती करून अंमलीपदार्थाचे शरीरावर होणारे दुष्परिणाम याबाबत माहिती दिली जाते. स्थानिक नागरीकांमध्ये व्यसनाधीनतेस प्रतिबंध म्हणुन अमंलीपदार्थाचे सेवन करणारे इसमांवर देखील एनडीपीएस कायदयांतर्गत कारवाई केली जाते. तसेच सातत्याने पोलीस पथकामार्फत नियमीतपणे गस्त करून बेकायदेशीर कृत्य, अंमली पदार्थ व्यापार याबाबत खास गोपनीय बातमीदारांमार्फत माहिती काढून वेगवेगळया ठिकाणी छापा टाकुन कारवाया केल्या जातात. त्यामध्ये आरोपींना अटक करून त्यांच्यावर प्रभावी प्रतिबंधक कारवाई केली जाते. नियमीतपणे कोंबीग ऑपरेशन राबवुन विशेष मोहिमेतंर्गत अभिलेखावरील अंमली पदार्थांची विक्री करणाऱ्या आरोपींची तपासणी करण्यात येते. नियमीतमणे आरोपींच्या हालचालींवर विशेष पथकांमार्फत लक्ष ठेवले जाते. त्यांच्या हालचाली संशयास्पद वाटल्यास त्यांची तात्काळ शहानिशा करून योग्य ती कायदेशीर कारवाई करण्यात येते.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## नाटे (ता.राजापूर, जि.रत्नागिरी) येथील श्री घेरा यशवंतगड किल्ल्याची डागडुजी व दुरूस्तीचे काम करणाऱ्या कंत्राटदारावर कारवाई करण्याबाबत

**(५१) * १४०२७ डॉ.आशिषराव देशमुख (सावनेर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **सांस्कृतिक कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाटे, (ता.राजापूर, जि.रत्नागिरी) येथील श्री घेरा यशवंतगड किल्ल्याची डागडुजी व दुरूस्तीचे काम निष्काळजीपणे व बेजबाबदारपणे करीत असल्याने संबधित कंत्राटदाराविरुध्द स्थानिक ग्रामस्थ आणि हजारो शिवप्रेमींनी संताप व रोष व्यक्त केला असल्याचे माहे जून, २०२५ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या किल्याच्या दुरुस्तीच्या कामासाठी सुमारे आठ कोटी रुपायांचा निधी खर्ची करण्यात येत असून डागडुजी व दुरुस्तीचे काम सुरू असताना आठ दिवसापूर्वीच नवीन बांधकाम करण्यात आलेली एक भिंत पडली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच सदर किल्ला पुरातत्व विभागाच्या अखत्यारित येत असून या किल्ल्याच्या दुरुस्तीच्या कामाच्या ठिकाणी कंत्राटदाराने कोणतेही सूचना फलक लावलेले नाहीत वा कोणतीही सुरक्षा व्यवस्था ठेवण्यात आलेली नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, गडकिल्ल्यांचे संवर्धन करताना संबंधित विभागाचे अधिकारी व नेमण्यात आलेले कंत्राटदार बेजबाबदार पध्दतीने काम करत असल्याने त्यांच्याविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**ॲड. आशिष शेलार :** (१) व (२) हे अशंत: खरे आहे.

यशवंतगड किल्ल्याची जुनी जांभा दगड व मातीच्या बांधकामाची भिंत पावसाच्या पाण्यामुळे ढासळली व ती नवीन बांधकामाच्या काही भागावर पडल्याने नवीन संरक्षक भिंतीचा काही भाग क्षतीग्रस्त होऊन पडलेला आहे.
(३) यशवंतगड किल्याच्या बाहेरील बाजूस फलक लावलेले आहे.
(४) मा. आमदार महोदय, स्थानिक गावकरी व संबंधित अधिकारी यांनी दि.२२.०६.२०२५ रोजी घटनास्थळास भेट देऊन अहवाल सादर केला आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मुंबई येथील महासंचालक लाचलुचपत प्रतिबंधक विभागातील कंत्राटी तत्वावर कार्यरत असलेल्या विधी सल्लागाराने बेहिशोबी मालमत्ता जमा केल्याबाबत

**(५२) * १३६१४ श्री.सुरेश धस (आष्टी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबई येथील महासंचालक लाचलुचपत प्रतिबंधक विभाग कार्यालयात कंत्राटी विधी सल्लागार पदावर श्री.दत्तात्रय भीमराव पुजारी हे सन २००८ पासून आजतागायत वर्षानुवर्षे ११ महिन्यांच्या सेवेवर कार्यरत आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर पदावर त्यांची सेवा कंत्राटी तत्त्वावर घेताना त्याच वर्षी फक्त नेमणुकीची पद्धती नियमानुसार राबविण्यात आली असून, त्यानंतर कोणत्याही निकोप स्पर्धेशिवाय श्री.पुजारी यांना आतापर्यंत ११ महिन्यांच्या कंत्राटी पद्धतीने कायम ठेवण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त कंत्राटी सेवेच्या कालावधीत त्यांना प्रती महिना ३५,०००/- रुपये व ५,०००/- इतर भत्ते असे एकूण ४०,०००/- रुपये एवढे उत्पन्न असताना, त्यांनी महाराष्ट्रातील लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या चौकशी अधिकाऱ्यांकडून नियमबाह्य पद्धतीने लाखो रुपयांचे हप्ते वसूल केल्याने शासनाकडे व महासंचालक लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई यांच्या कार्यालयाकडे अनेक तक्रारी प्राप्त झाल्या आहेत, हे ही खरे आहे काय,
(४) तसेच श्री.पुजारी यांनी माढा, करमाळा, केम, देवकरवाडी (जि.सोलापूर) नवी मुंबईतील सानपाडा, मुंबई तसेच ऑस्ट्रेलिया व अमेरिका इत्यादी परदेशातील ठिकाणी स्वतःची मुले व सुना यांच्या नावावर तसेच स्वतःच्या, पत्नीच्या व सासुरवाडीकडील लोकांच्या नावावर कोट्यवधी / अब्जावधी रुपयांच्या स्थावर / जंगम मालमता ठेवल्या असल्याच्या अनेक तक्रारी शासनाकडे प्राप्त झाल्या आहेत, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, सदर प्रकरणी शासनाकडे प्राप्त झालेल्या तक्रारीच्या अनुषंगाने सखोल चौकशी केली आहे काय, चौकशी अहवालात काय आढळून आले व त्या अहवालानुसार श्री.पुजारी यांच्याविरुद्ध कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय, हे खरे आहे.
(२) नाही. गृह विभागाच्या दि.१५.०९.२००६ च्या शासन निर्णयातील तरतूदींनुसार, वेळोवेळी जाहिराती प्रसिद्ध करुन मुलाखतींद्वारे निवड करुन सदर विधी सल्लागार यांची नियुक्ती करण्यात आली आहे.
(३) अंशतः खरे आहे. सदर प्रकरणी एक तक्रारदार वगळता इतर कोणत्याही तक्रारदाराची तक्रार लाचलुचपत प्रतिबंधक विभागास प्राप्त नाही.

(४) अंशतः खरे आहे. एका अर्जदाराने त्यांच्या दि.१९.०८.२०२४ च्या अर्जाद्वारे श्री. पुजारी यांच्या पत्नी, मुले, सुना व नातेवाईक यांच्या नावे असलेल्या स्थावर मालमत्तेबाबत आक्षेप नोंदविले आहेत.
(५) सदर प्रकरणी अर्जदाराने दाखल केलेल्या तक्रारीसोबत कोणतेही पुरावे सादर केले नसून मोघम स्वरुपात आरोप केले आहेत. त्यामुळे सदरचा अर्ज निकाली काढण्यात आला आहे.

-----------------

## मिरा-भाईंदर व वसई-विरार (जि.पालघर) या भागातील भवानी मोटर कंपनीने शेकडो नागरिकांची फसवणूक केल्याबाबत

**(५३) * ७३५५ श्री.काशिनाथ महादु दाते (पारनेर), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.नरेंद्र मेहता (मिरा भाईंदर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मिरा-भाईंदर व वसई-विरार (जि.पालघर) या भागातील नागरिकांना वाहने विकत घेवून ती वाहने भाड्याने लावण्यासाठी गुंतवणूक केल्यास त्याबदल्यात दर महिन्याला भाडे देण्याच्या नावाखाली भवानी मोटर्स नामक कंपनीने शेकडो नागरिकांची आर्थिक फसवणूक करुन सुमारे ५०० करोड रुपयांचा गैरव्यवहार केल्याचे नुकतेच निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या अमिषाला बळी पडून शेकडो नागरिकांनी गुंतवणूक केली असता, त्यातून त्यांना गुंतवणुकीचे भाडे अथवा मुद्दलही मिळाली नसल्याचे त्यांच्याविरुद्ध काशिमिरा पोलीस ठाणे येथे गुन्हा दाखल करण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने संबंधितांविरुद्ध कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय, हे अंशत: खरे आहे.

मिरा गावठाण, काशिमीरा, मिरारोड पूर्व, तालुका-जिल्हा ठाणे व इतर ठिकाणी आरोपीमार्फत भवानी मोटर्स या संस्थेद्वारे गुंतवणूकदार यांचेकडून ऑनलाईन तसेच रोख रक्कम स्विकारुन तसेच गुंतवणुकदार यांचे नावे फायनान्स कंपनीचे लोन मंजुर करुन गाडी खरेदी करण्यात येत असे. ज्या गुंतवणुकदार यांचे नावे लोन मंजूर होत नाही, त्यांना भवानी मोटर्सच्या नावे लोन मंजुर करुन भवानी मोटर्सच्या लेटर हेडवर त्यांची गाडी खरेदी करण्यात येत असे. नंतर त्या गाड्या जेएनपीटी येथे भाड्याने लावून त्या गाड्यांचे भाडे देण्यात येत असे. सुरुवातीला गाडीचे भाडे गुंतवणूकदारांच्या बँक खात्यात जमा करुन आरोपींनी गुंतवणूकदारांचा विश्वास संपादन केला. परंतु त्यानंतर गाडीच्या बुकींगसाठी घेतलेली रक्कम व गाड्यांचा अपहार केला म्हणून माहे एप्रिल २०२५ मध्ये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

गुन्ह्याचे तपासात एकुण पिडीत गुंतवणूकदारांची संख्या ही अंदाजे १४०० इतकी असुन त्यांनी गुंतवणुक केलेली रक्कम ही अंदाजे रु.२५ करोड रुपये इतकी असल्याचे तपासातून दिसत आहे. परंतु गुन्ह्याचे तपासात अद्यापपर्यंत एकूण ३२९ गुंतवणूकदारांचे जबाब नोंदविण्यात आले असून त्यांनी एकूण रु.६,३७,६५,०००/- इतकी रक्कम आरोपी वित्तीय संस्थेमध्ये गुंतवणूक केली असल्याचे दिसून आले आहे. तसेच इतर गुंतवणुकदार यांचेकडे तपास चालू आहे.

(२) होय, हे अंशत: खरे आहे.

सदर प्रकरणी दिनांक २०/०४/२०२५ रोजी काशिमीरा पोलीस स्टेशन येथे गु.र.नं. १७२/२०२५ भा.न्या.सं. कलम १११ (२)(ए), ३१८(४), ३१६(२), ३(५) सह एम.पी.आय.डी. अधिनियम,१९९९ चे कलम ३ आणि ४ प्रमाणे गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. या प्रकरणी फिर्यादीने दिलेल्या तक्रारीनुसार सुरुवातीला गाडीचे भाडे फिर्यादी व साक्षीदार यांच्या बँक खात्यात जमा करण्यात आले. त्यामुळे फिर्यादी व साक्षीदार यांचा कंपनीवर विश्वास बसला. परंतु, तद्नंतर आरोपींनी गाडीचे बुकींगसाठी घेतलेली रक्कम व गाड्यांचा अपहार करुन फिर्यादी व साक्षीदार यांची फसवणूक केली आहे.

(३) नमूद गुन्ह्यातील आरोपीतांचे बँक खाते गोठविण्यात आले आहे. गुन्ह्यातील मुख्य आरोपी याच्या भवानी ओवरसिज एलएलपी, वसई, जि. पालघर या कार्यालयाची तसेच काळा चौकी, मुंबई येथील घराची झडती घेवून लॅपटॉप, प्रिंटर, रोख रक्कम व इतर मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. गुंतवणूकदार यांची एकुण २६४ वाहने ताब्यात घेण्यात आली आहेत. त्यापैकी मा.न्यायालयाच्या आदेशान्वये ११ वाहने मुळ मालक यांना परत दिलेली आहेत. तसेच एका आरोपीची एक स्थावर मालमत्ता (खोली) संरक्षित करण्यात आली आहे. गुन्ह्याच्या आजपर्यंतच्या तपासात एकुण रु.२५,२२,१४,४११/- इतक्या रकमेची मालमत्ता हस्तगत करण्यात आलेली आहे.

सदर प्रकरणी आरोपीतांविरुध्द जा.क्र.८९३९/२०२५, दिनांक २०/०६/२०२५ रोजी मा.न्यायालयात दोषारोपपत्र दाखल केले आहे. गुन्ह्याचे अनुषंगाने पुढील तपास सुरु आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**मौजे बनपुरी (ता.आटपाडी, जि.सांगली) येथील अल्पवयीन मुलगी बेपत्ता झाल्याबाबत**

**(५४) * १३६८८ श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.हेमंत ओगले (श्रीरामपूर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे बनपुरी (ता.आटपाडी जि.सांगली) येथील एक अल्पवयीन मुलगी बेपत्ता असल्याची तक्रार मुलीच्या पालकांनी दिनांक ७ एप्रिल, २०२५ रोजी संशयित आरोपीविरुद्ध आटपाडी पोलिस ठाण्यात तक्रार नोंदवुनही अद्यापपर्यंत आरोपीस अटक करण्यात आलेले नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी सुमारे दोन महिन्याचा कालावधीत उलटुन सुद्धा अद्यापही मुलीचा शोध न लागल्यामुळे, पोलीस उपअधीक्षक, विटा यांना विचारणा केली असता त्यांच्याकडून समाधानकारक उत्तरे मिळत नसल्याने पोलिस प्रशासनाविरुद्ध मुलीच्या वडीलांनी आटपाडी पोलिस ठाण्यासमोर दिनांक ६ जून, २०२५ पासुन उपोषण आणि गावकऱ्यांनी गावबंद आंदोलन सुरु केले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच सदर प्रकरणी मुलीच्या पालकांनी व गावकऱ्यांनी पोलिस उपविभागीय अधिकारी तसेच पोलिस अधिक्षकांकडे प्रत्यक्ष भेटुन अल्पवयीन मुलीस त्वरित शोधुन आरोपी विरुद्ध कठोर कारवाई करण्याची मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने उक्त प्रकरणात तपासात दिरंगाई करणाऱ्या जबाबदार पोलीस अधिकारी व कर्मचारी यांच्यासह आरोपीविरुद्ध कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) सदर प्रकरणी आटपाडी पोलीस ठाणे,सांगली येथे गु.र.क्र.११७/२०२५ भारतीय न्याय संहिता,२०२३ चे कलम १३७ (२), ६४, ६४ (१), ६४ (२) (एम) सह बालकांचे लैंगिक अपराधापासून संरक्षण अधिनियम, २०१२ चे कलम ४, ६ अन्वये दि.०७.०४.२०२५ रोजी गुन्हा नोंद करण्यात आला आहे. सदर गुन्ह्यात आरोपी अटक असून, न्यायालयीन कोठडीत आहे.

(२) फिर्यादी हे दि.०२ जून, २०२५ रोजी पासून तहसिल कार्यालय, आटपाडी, जि.सांगली येथे उपोषणाला बसले होते.

गुन्ह्यातील आरोपी व अपहृत मुलगी हे दि.०९.०६.२०२५ रोजी भिवंडी, जिल्हा ठाणे येथे मिळून आले असता, पीडितेचे तक्रारीवरुन आरोपीस अटक करण्यात आली आहे.

(३) खरे आहे.

(४) सदर प्रकरणी गुन्हा दाखल केल्यानंतर पीडिता व आरोपीचा शोध घेण्याकरीता दोन तपास पथक नेमण्यात आले होते. तसेच तांत्रिक माहितीच्या आधारे तपास केला असता भिवंडी, जि.ठाणे येथून आरोपी व पीडितेस ताब्यात घेण्यात आले.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## नवी मुंबईतील भूमी अभिलेख कार्यालयातील अधिकाऱ्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने पकडल्याबाबत

**(५५) * १४०३१ डॉ.आशिषराव देशमुख (सावनेर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नवी मुंबईतील आंतरराष्ट्रीय विमानतळ प्रभावित क्षेत्र (नैना प्रकल्प) अंतर्गत अनेक नागरिकांनी त्यांच्या नावे असलेल्या जमिनींशी संबंधित प्रलंबित कामे करण्यासाठी (विशेषतः जमिनीच्या पोटहिस्स्याचे सर्वेक्षण, आकारफोड, फेरमोजणी यासाठी) अनेक अर्ज केले असून या अर्जदारांची कामे करून देण्याच्या बदल्यात भूमी अभिलेख विभागातील संबंधित अधिकारीवर्ग हे नागरिकांकडे मोठ्या प्रमाणात पैश्याची मागणी करत असल्याचे माहे जून, २०२५ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर कार्यालयातील श्री.संजीपान प्रभाकर सानप नावाच्या अधिकाऱ्याने एका नागरिकाकडे त्यांचे काम करून देण्यासाठी दोन लाख रुपयांची मागणी करून त्यातील पन्नास हजार रुपये रक्कम घेताना त्यांना नवी मुंबई लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने रंगेहाथ पकडले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी करुन नागरिकांची प्रलंबित कामे तातडीने निकाली काढणेबाबत तसेच संबंधित दोषींविरुद्ध कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) नैना प्रकल्पांतर्गत येणाऱ्या जमिनीचा पोटहिस्सा सर्वेक्षण करण्यासाठी, आकारफोड व फेरमोजणी करणे इत्यादी कामांसाठी दरमहा सुमारे ३ ते ४ प्रकरणे जिल्हा भुमी अधिक्षक कार्यालयास प्राप्त होत असतात. त्यापैकी एका कामासाठी भूमी अभिलेख कार्यालयातील शिरस्तेदार यांनी लाचेची मागणी केल्याची बाब निदर्शनास आली आहे.

(२) हे खरे आहे.

लाचलुचपत प्रतिबंध विभागामार्फत करण्यात आलेल्या लाच मागणीच्या पडताळणी कारवाईमध्ये दिनांक ०५.०६.२०२५ रोजी आरोपी लोकसेवक, शिरस्तेदार, जिल्हा अधिक्षक, भुमी अभिलेख, नैना प्रकल्प सिडको, नवी मुंबई यांना लाचेची रक्कम स्विकारतांना रंगेहाथ पकडल्यामुळे त्यांच्याविरुद्ध सीबीडी पोलीस स्टेशन, नवी मुंबई येथे गु.र.नं. २६९/२०२५ भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम १९८८ (सुधारणा २०१८) चे कलम ७ प्रमाणे दिनांक ०७.०६.२०२५ रोजी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदर गुन्हयाचा सखोल तपास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग यांच्याकडून सुरु आहे.

(३) जिल्हा अधिक्षक, भुमी अभिलेख, नैना प्रकल्प सिडको, नवी मुंबई यांच्या कार्यालयाकडून पोटहिस्सा, बिनशेती मोजणीची प्रकरणे विहित नियमावलीनुसार पुर्ण करण्यात येतात. सर्वसामान्य जनतेसाठी मिळकत पत्रिका https:/mahabhumi.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात आले असून EPCIS, PDE या ऑनलाईन प्रणालीद्वारे नागरिकांना फेरफार अर्ज ऑनलाईन/ऑफलाईन पद्धतीने करण्याची सुविधा उपलब्ध आहे.

सदर प्रकरणी, दाखल गुन्हयाच्या अनुषंगाने, आरोपी लोकसेवक, शिरस्तेदार, जिल्हा अधिक्षक, भुमी अभिलेख, नैना प्रकल्प सिडको, नवी मुंबई यांना उपसंचालक, भूमि अभिलेख, कोकण प्रदेश, मुंबई यांच्या दिनांक २६.०६.२०२५ रोजीच्या आदेशान्वये शासन सेवेतून निलंबित करण्यात आलेले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**विधान भवन :**
**मुंबई.**

**जितेंद्र भोळे**
**सचिव-१,**
**महाराष्ट्र विधानसभा**

---

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.